cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१५४ | सोमवार, दि.२९ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### ताजमहाल पुन्हा सर्वाधिक भेट दिला जाणारा वारसा

● नवी दिल्ली : आग्रा येथील भारताचे गौरवशाली पांढरे संगमरवरी स्मारक 'ताजमहाल' पुन्हा एकदा देशातील सर्वाधिक भेट दिलेल्या स्मारकांपैकी एक ठरले आहे. पर्यटन मंत्रालयाच्या ताज्या आकडेवारीनुसार, २०२४-२५ या वर्षात ६९ लाख पर्यटकांनी या स्थळाला भेट दिली, ज्यात एकूण ६ लाख विदेशी पर्यटकांचा समावेश आहे. मुघलकालीन सम्राट शाहजहाँ आणि त्याची पत्नी मुमताज महल यांच्या १७ व्या शतकातील या समाधीने मागील दशकापासून सर्वाधिक महसूल आणि सर्वाधिक पर्यटकसंख्या राखली आहे. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण संरक्षित १४५ तिकीट असलेल्या स्मारकांच्या एकूण पर्यटक नोंदींमध्ये ताजमहालचा वाटा जवळपास १२ टक्के आहे.

### कुपवाडात दोन दहशतवाद्यांना कंठस्नान

● कुपवाडा: जम्मू आणि काश्मीरमधील कुपवाडा जिल्ह्यातील केरन सेक्टरमध्ये सैन्याने दोन दहशतवाद्यांना ठार मारले. ते नियंत्रण रेषेवरून घुसखोरी करण्याचा प्रयत्न करत होते. सूत्रांचे म्हणणे आहे की मृतदेह नियंत्रण रेषेच्या अगदी जवळ पडले आहेत. सीमेपलीकडून गोळीबाराच्या धोक्यामुळे कडक सुरक्षा व्यवस्थेत लोकांना बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांची ओळख आणि त्यांचे संबंध अद्याप जाहीर झालेले नाहीत. गेल्या आठ दिवसांत लष्कर आणि दहशतवाद्यांमध्ये झालेली ही दुसरी चकमक आहे. यापूर्वी २० सप्टेंबर रोजी जम्मू-काश्मीरमधील उधमपूरमध्ये दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत एक जवान शहीद झाला होता.

### भास्कर चंदनशिव यांचे निधन

● लातूरः ग्रामीण भागातील जीवन आपल्या लेखणीच्या माध्यमातून मांडणारे ज्येष्ठ साहित्यिक भास्कर चंदनशिव यांचे निधन झाले आहे. त्यांची 'लाल चिखल' ही कथा महाराष्ट्रातील घराघरांत पोहोचली होती. शनिवारी उपचारादरम्यान भास्कर चंदनशिव यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने साहित्यक्षेत्रात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. लातूरमधील एका खासगी रुग्णालयात उपचार घेत असताना त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. भास्कर चंदनशिव हे २८ वे मराठवाडा साहित्य संमेलन धाराशिवचे अध्यक्ष होते. त्यांनी राष्ट्रीय शेतकरी साहित्य संमेलनाचे देखील अध्यक्षपद भूषविले होते. त्यांचे जांभळढव्ह (१९८०), मरणकळा (१९८३), अंगारमाती (१९९१), नवी वारूळ (१९९२), बिरडं (१९९९) हे कथासंग्रह चांगलेच गाजले. ग्रामीण जीवनातील दुष्काळ, शेतकरी जीवन, आणि सामाजिक संघर्ष यावरील त्यांचे लिखाण हृदयस्पर्शी होते. 'लाल चिखल' हा कथासंग्रह त्याचेच एक उदाहरण आहे.

### ठाकरे बंधुंची सगळी गणिते आपल्याकडे-एकनाथ शिंदे

● मुंबई: आगामी पालिका निवडणुकांसंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना कानमंत्र दिला आहे. पालिका निवडणुकीत वाटाघाटीवेळी पक्षाच्या आत्मसन्मानाला ठेच पोहोचणार नाही, असा विश्वास शिंदेंनी व्यक्त केला. कोण कोणाशी युती करतेय त्याची चिंता करू नका, त्यांची सर्व गणिते आपल्यापकडे आहेत, असा टोला शिंदेंनी ठाकरे बंधूंना लगावला. पालिका निवडणूक जिंकण्याचा निश्चयाने दसरा मेळाव्यात गर्दी करा, असे आवाहनही शिंदेंनी पदाधिकाऱ्यांना केले. आगामी महापालिका निवडणुकीच्या तयारीसाठी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा पार पडला. या निवडणुकीची जबाबदारी शाखाप्रमुख आणि गटप्रमुखांवर सोपवण्यात आली आहे. तसेच जिंकण्याची शाश्वती असलेल्या जागाच मागण्यात येतील असेही निश्चित झाल्याची माहिती आहे.

### भारत नक्षलवादापासून मुक्त होईल -अमित शहा

● दिल्लीः डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी रिसर्च फाउंडेशनने रविवारी (२८ सप्टेंबर) दिल्लीतील विज्ञान भवन येथे ''भारत मंथन २०२५ - नक्षलमुक्त भारत'' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या कार्यक्रमाला संबोधित केले. त्यांनी सांगितले की, ३१ मार्च २०२६ पर्यंत भारत नक्षलवादापासून मुक्त होईल. जोपर्यंत आपल्याला नक्षलवादाची विचारसरणी कोणी वाढवली हे समजत नाही तोपर्यंत नक्षलवाद संपणार नाही. अनेक लोकांचा असा विश्वास आहे की सशस्त्र कारवाया संपल्याने नक्षलवादाची समस्या संपेल, परंतु असे नाही.

# ज्याच्या घरात पाणी शिरले त्यांना तातडीने १० हजार

## मुख्यमंत्री फडणवीसांचे प्रशासनाला निर्देश, पुरग्रस्तासाठी तत्काळ २ हजार कोटींचा निधी

चंद्रपूर । प्रतिनिधी

**मराठवाड्यातील पुरस्थिती गंभीर असून प्रशासनाला तातडीच्या मदत कार्याचे निर्देश दिले आहेत. पुरग्रस्तांना तत्काळ २ हजार कोटींचा निधी वितरीत करण्यात आला आहे. ज्याच्या घरात पाणी शिरले आहे त्यांना तातडीने १० हजाराचा मदत दिली जात आहे. पुढचे दोन तीन दिवस गंभीर असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस माध्यमांशी बोलताना सांगितले. तत्पूर्वी त्यांनी खणीकर्म विभागाच्या माहिती पुस्तिकेचे अनावरण केले.**



नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने चंद्रपूर जिल्ह्यातील मुल येथील फडणवीस वाड्यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (२८ सप्टेंबर) सकाळी उपस्थिती दर्शवली. यावेळी त्यांनी मराठवाड्यातील पूर स्थितीबद्दल माध्यमांशी संवाद साधला. फडणवीस यांनी सांगितले की, मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांशी थेट संवाद साधला असून, पूर निवारण व पुनर्वसनाबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांशीही चर्चा करून आवश्यक उपाययोजना राबविण्याचे आदेश दिले आहेत. राज्य सरकारने पूरनिवारणासाठी दोन हजार कोटी रुपये रिलिज केले असून, त्याचे वाटप सुरू झाले आहे. घरामध्ये पाणी घुसलेल्या कुटुंबांना तातडीने दहा हजार रुपयांची मदत दिली जात आहे. तसेच नागरिकांना अन्नधान्य व पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले जात आहे. काही ▶▶ पान २ वर

# शिर्डीच्या साईबाबा संस्थानकडून बळीराजाच्या मदतीसाठी एक कोटी

शिर्डी । प्रतिनिधी

महाराष्ट्रात सर्वत्र सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये जनजीवन मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाले आहे. या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले असून, अनेक ठिकाणी ओल्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. बळीराजाच्या मदतीसाठी अनेक सामाजिक संस्था मदतीचा हात देत आहेत. आता शिर्डीच्या साईबाबा संस्थानने सामाजिक बांधिलकी जपली आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी एक कोटींची मदत जाहीर करण्यात आली आहे.




पावसाचा सर्वाधिक फटका मराठवाडा विभागाला बसला आहे. तर उत्तर महाराष्ट्रात देखील मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत देण्याचे आदेश दिले आहेत. तसेच सर्व मंत्र्यांना दुष्काळी भागांचे दौरे करण्याचे निर्देश देखील देण्यात आले ▶▶ पान २ वर

# तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलवा

## जयंत पाटील यांचे राज्यपालांना पत्र

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीवर चर्चा व्हावी म्हणून तीन दिवसाचे विशेष अधिवेशन बोलवा असे विनंती करणारे पत्र राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांना लिहिले आहे.**

जयंत पाटील राज्यपालांना पाठविलेल्या पत्रात म्हणाले की, यावर्षी राज्यभरात पावसाने थैमान घातले आहे. मागील आठवड्याभरापासून तर



पावसाचा जोर अधिकच वाढला आहे. ओढे नाले दुथडी भरून वाहत आहेत. शेतीचा चिखल झाला आहे. शेतकऱ्यांची जनावरे दगावली आहेत. पूरग्रस्त भागात अनेक लोक अडकले आहेत, तर काही लोकांनी जीव गमावला आहे. संपूर्ण राज्यात हाहाकार माजला असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. पुढे जयंत पाटील पत्रात म्हणाले की, मी मागील काही दिवसांपासून अतिवृष्टी आणि पूरामुळे बाधित झालेल्या गावांना प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी करत आहे. शेतकऱ्यांवर मोठा बिकट काळ ओढावला आहे. पूराच्या पाण्यामुळे फक्त पिकं नष्ट झाली असे नाही तर शेतकऱ्यांची जमीनही खरडून वाहून गेली आहे. नुकसान इतके झाले आहे की शेतकरी ▶▶ पान २ वर

# राज्यातील वीज कर्मचारी ९ ऑक्टोबरला संपावर

मुंबई । प्रतिनिधी

**वीज कंपन्यांचे खासगीकरण व महावितरण कंपनीच्या पुनर्रचनेविरोधात ९ ऑक्टोबर रोजी राज्यव्यापी संप पुकारण्यात आला आहे. या संपामध्ये ८६ हजार वीज कर्मचारी, अभियंते, अधिकारी व ४२ हजार कंत्राटी कामगार सहभागी होणार आहेत.**


महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या वीज कंपन्यांत अनेक पद्धतीने खासगीकरण सुरू आहे. महावितरण कंपनीच्या नफ्याच्या क्षेत्रात टोरंटो, अदानी व इतर खासगी भांडवलदारांना समांतर वीज वितरणाचा परवाना दिला असून एकतर्फी पुनर्रचना लागू केली आहे. जानेवारी २०२३ पासून या ज्वलंत विषयांबाबत कृती समिती सातत्याने त्यांनाशी व प्रशासनासोबत पत्रव्यवहार करत आहे. ४ जानेवारी २०२३ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तिन्ही वीज कंपन्यांचे व्यवस्थापन व कृती समिती यांची मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये ▶▶ पान २ वर

# गोदाकाठच्या नागरिकांना सतर्कतेचे आदेश

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी


**जायकवाडी प्रकल्प मधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू झाला असून आता पुन्हा काही दरवाजे उघडले गेले नाही गोदाकाठ व त्या परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्या चे निर्देश जिल्हा प्रशासन जायकवाडी विभागाने दिले आहेत.**

गेल्या चार दिवसापासून राज्यात आणि विशेषता मराठवाड्यामध्ये अतिवृष्टी



झाली आहे नदी नाल्यांना मोठ्या प्रमाणात पूर आला आहे प्रकल्पातील पाणीसाठा मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने जायकवाडी माजलगाव मांजरा आधी प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात विसर्ग होत आहे काही दरवाजे देखील उघडण्यात आल्याने नदीकाठच्या गावांना धोका होऊ ▶▶ पान २ वर

## माळ आठवी



अष्टमीचे दिवशी
अष्टभुजा नारायणी हो ।
संह्याद्री पर्वती उभी
पाहिली जगत्जननी हो
मन माझे मोहिले शरण
आलो तुज लागुनी हो ।
स्तनपान देऊनी सुखी केले
अंत:करणी हो ।। ८ ।।
उदो बोला उदो
अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय
महिमा वर्णू तिचा हो ।।

## पंतप्रधानांच्या हस्ते बीएसएनएलच्या स्वदेशी निर्मित '४ जी' सेवेचे लोकार्पण

दिल्ली। वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आत्मनिर्भर भारत योजनेंतर्गत संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या '४ जी' तंत्रज्ञानाधारित सेवेचे लोकार्पण झारसुगुडा ओडिशा येथून दूरदृष्य प्रणालीद्वारे झाले. याअंतर्गत बीएसएनएलच्या ९२ हजार ६३३ टॉवर्सचे लोकार्पण झाले असून, यापैकी ९ हजार ३० टॉवर्स महाराष्ट्रात उभारले गेले आहेत. या माध्यमातून देशातील तसेच राज्यातील लाखो लोकांपर्यंत '४ जी' तंत्रज्ञान पोहोचणार असून महाराष्ट्र शासनाच्या अकराशे ऑनलाईन सेवा गावागावात पोहोचण्यात या कनेक्टिव्हिटीचा फायदा होणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते '४' नेटवर्कच्या दूरदृष्य प्रणालीद्वारे लोकार्पणानिमित्त साहित्यरत्न ▶▶ पान २ वर

# भाजपाच्या दबावामुळे युती करत नाहीत का

## ● प्रकाश आंबेडकर यांचा काँग्रेसला सवाल

मुंबई । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेसवर निशाणा साधला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपा आणि त्याचे मित्रपक्ष सोडून इतर कोणत्याही पक्षांसोबत युती करण्यास आम्ही तयार असल्याचे मी २१ मे रोजी स्पष्ट केले होते, तसेच माझी पत्नी अंजली आंबेडकर यांनीही १८



जून रोजी त्याच भूमिकेची पुनरावृत्ती केली होती, असे आंबेडकरांनी सांगितले. मात्र, आजतागायत काँग्रेस किंवा इतर कोणत्याही पक्षाने वंचित बहुजन आघाडीसोबत युतीसाठी कोणताही संपर्क साधलेला नाही, याबद्दल प्रकाश आंबेडकर यांची प्रश्न उपस्थित केला.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, भाजपाने काँग्रेसला वंचित बहुजन आघाडीसोबत युती करू नये, असा दबाव आणला आहे का? भाजपाकडे काँग्रेसविषयी असे ▶▶ पान २ वर

## संघाने गांधी विचार स्वीकारावे-सपकाळ

नागपूर । प्रतिनिधी

राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती, दसरा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शंभर वर्ष हा सुवर्णयोग एकाच दिवशी आलेला आहे. रा.स्व. संघाला १०० वर्षे होत असताना आलेला हा योग संघाने समजून घ्यायला हवा. गांधी पुतळ्याच्या समोर फक्त मानवंदना देऊन चालणारा नाही तर नथुरामचा धिक्कार करून बुरसटलेले विचार, मनुस्मृती आणि बंच ऑफ थॉट ला तिलांजली देऊन गांधी ▶▶ पान २ वर

# राज्यातील ८९ फार्मसी महाविद्यालयांची मान्यता रद्द

## राज्य तंत्रज्ञान विभागाचा निर्णय, वारंवार नियमांचे उल्लंघन केल्याने कारवाई

मुंबई । प्रतिनिधी

**वारंवार नियम धाब्यावर बसवणाऱ्या महाराष्ट्रातील ८९ फार्मसी कॉलेजची मान्यता अखेर रद्द करण्यात आली आहे. त्यात नागपूर, ठाणे, कोल्हापूर, नाशिक आणि सोलापूर जिल्ह्यातील नामांकित फार्मसी कॉलेजचा समावेश आहे. परिणामी, विद्यार्थ्यांना यंदा डी. फार्मच्या ७९ आणि बी. फार्मच्या १८ कॉलेजमध्ये प्रवेश घेता येणार नाही. राज्य तंत्रशिक्षण विभागाने हा धाडसी निर्णय घेतला.**

फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया (पीसीआय)च्या शिफारशींनंतर ही कारवाई करण्यात आली. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आणि तंत्रशिक्षण संचालनालयाने केलेल्या तपासणीत कॉलेजकडून वारंवार



नियमांचे उल्लंघन होत असल्याचे आढळून आले आहे. त्यानंतर, शैक्षणिक गुणवत्ता राखण्यासाठी राज्य सरकारने पीसीआयला या महाविद्यालयांमध्ये अभाव, अपूर्ण प्रयोगशाळा, अपुरी पायाभूत सुविधा आणि पात्र शिक्षक आणि प्राचार्यांचा अभाव यासह गंभीर कमतरता आढळून आल्या. या कमतरतांमुळे असे दिसून आले की, अनेक महाविद्यालये केवळ नावापुरती कार्यरत होती, तर त्यांची शैक्षणिक गुणवत्ता खूपच खराब होती. ▶▶ पान २ वर


### महाविद्यालयांची भरमसाठ संख्या

राज्यात गेल्या काही वर्षांत फार्मसी अभ्यासक्रमाची महाविद्यालये भरमसाट वाढली होती. त्यामुळे फार्मसी कॉलेजांच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त राहिल्या होत्या. तसेच अनेक महाविद्यालयांना विद्यार्थीही मिळू शकले नव्हते. त्यामुळे भरमसाट वाढलेल्या महाविद्यालयांमध्ये गुणवत्तेचाही अभाव होता. त्यामुळे त्यांच्यावर चाप आणण्याची मागणी होत होती.

## अर्चना कुटेच्या पोलीस कोठडीत वाढ!

बीड । प्रतिनिधी

**ज्ञानराधा मल्टीस्टेट घोटाळ्यात अटक करण्यात आलेल्या अर्चना कुटे यांच्या पोलीस कोठडीत दोन दिवसांची वाढ करण्यात आली आहे.**



जानेवारी २०२४ मध्ये बीड येथील ज्ञानराधा मल्टीस्टेट मध्ये हजारो कोटींचा घोटाळा उघडकीस आला. सुरेश कुटे, आशिष पाटोदेकर यांच्यासह उपाध्यक्ष यशवंत कुलकर्णी यांना त्यावेळी अटक करण्यात आली होती. मात्र त्यावेळी पुण्यातून सुरेश कुटे यांच्यासोबत बीडच्या एसपी ऑफिस मध्ये आणण्यात आलेल्या अर्चना कुटे यांना सोडून देण्यात आले होते. दरम्यान तब्बल पंधरा महिन्यांनी सी आय डी ने अर्चना कुटे यांना पुण्यातून ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२४ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ६९.०० क्विंटल | २,२९१ | २,८९९ | २,५७५ |
| ज्वारी/हायब्रिड : ६६.५० क्विंटल | २,०७० | ३,१५२ | २,३६६ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ९.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |
| उडीद : ४९.०० क्विंटल | ३,८०० | ५,९०० | ५,१९५ |
| बाजरी: ११०.०० क्विंटल | २,२०० | ४,५०० | २,६८८ |
| मुग: १६.५० क्विंटल | ४,४०० | ७,६७१ | ५,९८६ |
| सोयाबीन: ४.०० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| हरभरा: १.५० क्विंटल | ४,९५० | ४,९५० | ४,९५० |

cmyk

अग्रलेख

# जीव चाललेत ; महाराष्ट्रासाठी केंद्र कधी धावणार?

अवकाळी पावसाने महाराष्ट्र उद्ध्वस्त केला आहे. मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र सर्वत्र ढगफुटीसारखा पाऊस होऊन शेतकऱ्यांचे संसार मोडले, गावं गारद झाली आणि ५७ लाख एकरांवरील पिकं वाहून गेली. ३१ लाखांहून अधिक शेतकरी बाधित झाले असून ८ जणांचा मृत्यू, १० जखमी, तर शेकडो गावं वीज-रस्ते-पाणी यांपासून वंचित झाली आहेत. ३० जिल्हे व ३०० तालुके पुरग्रस्त ठरलेत. अशावेळी केंद्राने महाराष्ट्राची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन मदतीला धावण्याची गरज होती. मात्र केंद्र सिंहासनावरून हलायला तयार नाही. आर्थिक तंगीमुळे राज्य सरकारकडून मदत उशिरा आणि अपुरी मिळतेय. सरकारने २२१५ कोटींची घोषणा केली असली तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे पोहोचले नाहीत. पंचनाम्यांची प्रक्रिया ढिम्म आहे. दुसरीकडे पाऊस थांबायचे नाव घेत नाही. अशा वेळी शेतकऱ्यांची जीव जाण्याची वेळ आली आहे मात्र तरीसुद्धा केंद्र महाराष्ट्राच्या मदतीला धावताना दिसत नाही.

केंद्र सरकारकडून विशेष पॅकेजची घोषणा व्हायची बाकी आहे. गुजरातला नेहमी मदत मिळते, पण महाराष्ट्रावर मात्र दुजाभाव होतोय, असा आरोप शेतकरी आणि विरोधक करत आहेत. हे डबल इंजिन आहे की डबल धोका? असा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांचा रोषही उफाळून आला आहे. विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. उद्धव ठाकरे यांनी मराठवाडा दौऱ्यात १० हजार कोटींचे पॅकेज मागितले. शरद पवारांनी पुनर्वसनासह मदतीचे आवाहन केले. काँग्रेसचे हर्षवर्धन सपकाळ यांनी '३० जिह्यांत नुकसान, मदत शून्य' अशी टीका केली. संजय राऊत यांनी ६० लाख एकर पिकं वाहून गेल्याचा दावा केला. जयंत पाटील यांनी पीएम केअरमधील पैसे महाराष्ट्राला द्या, असे फडणवीसांना आव्हान दिले. मात्र राज्य सरकार 'राजकारण करू नका' म्हणत जबाबदारी झटकतेय, तर प्रत्यक्षात अमित शाहांच्या दौऱ्याची जय्यत तयारी चालू आहे. लोकांचा संताप मात्र वाढतोय. उद्धव ठाकरे सरकारच्या काळातही केंद्राने मदत नाकारली होती. कोविड व अतिवृष्टीत गुजरातला हजारो कोटी मिळाले, पण महाराष्ट्राला 'राज्यनिधीतून खर्च करा' असे सांगण्यात आले. आता फडणवीस सरकार असूनही केंद्राची मदत न मिळणे गंभीर आहे.

मार्च २०२५ मध्ये संसदेतच केंद्रीय कृषिमंत्र्यांनी महाराष्ट्रातील ३.२५ लाख एकर जमीन गमावल्याचे मान्य केले होते. तरीही पॅकेज नाही! मग डबल इंजिनचा उपयोग काय? शेतकरी डबल संकटात सापडले आहेत. केंद्र व राज्य सरकारने जनतेचा आक्रोश ऐकला नाही, तर हा रोष थेट निवडणुकीत व्यक्त होईल. बळीराजाला आधार देणे हे राजकारण नसून महाराष्ट्राच्या अस्तित्वाचा तो प्रश्न आहे. एका प्रगत राज्याला त्याच्या अडचणीच्या काळात केंद्र सरकार मदतीला धावणार नाही तर केव्हा धावणार?

ओला दुष्काळ जाहीर करा, तातडीची मदत द्या, अन्यथा बळीराजा पुन्हा आत्महत्या आणि रस्त्यावर येण्यास भाग पडेल हे बोलणे विरोधकांचे काम आहे आणि त्यांनी ते बोलले पाहिजे हे समजून घेणे यातच महाराष्ट्राचे आणि राज्यकर्त्यांचेही हित आहे. विरोधकांच्या भीतीशिवाय केंद्र सरकारच्या हातातून पैसा सुटणार नाही हे आता भाजप, अजित पवार राष्ट्रवादी आणि शिंदे सेनेनेही समजून घेऊन किमान महाराष्ट्र हितासाठी तरी केंद्राला विरोधकांचा बाऊ दाखवला पाहिजे. नाहीतर घरच्या तीन बाहुबलींचा प्रभाव केंद्रावर पडणार नाही हे सत्यच सध्या उजळपणे दिसत आहे. राज्यातील ३६ पैकी ३० जिल्हे आणि ३५८ तालुक्यांपैकी ३०० तालुके अतिवृष्टी आणि पुराच्या लाटेत बुडाले आहेत. नांदेड, बीड, धाराशिव, जालना, परभणी, सोलापूर, अहिल्यानगर (अहमदनगर) आणि सातारा यांसारख्या भागांत ढगफुटीसारखा पाऊस कोसळला. हिंगोली, नांदेडसारख्या जिह्यांत शेतकरी रस्त्यावर उतरले आहेत. 'मदत कधी? पंचनामे कधी?' असा प्रश्न विचारत आहेत. पण महायुती सरकार मात्र 'पंचनामे होताहेत' असे सांगून वेळ मारुन नेत असल्याचे दिसत आहे.

# गुटक्यावर दोन ठिकाणी छापे दीड लाखाचा ऐवज जप्त

## बीड शहर पोलिसांची कारवाई



**बीड । प्रतिनिधी**

**गुटखा विक्रीवर कडक कारवाई करण्याचे पोलीस अधीक्षक. नवनीत काँवत यांनी दिलेले निर्देश अंमलात आणत आज सकाळी दोन ठिकाणी छापे टाकण्यात आले.**

गुप्त माहितीच्या आधारे थिगळे गल्लीतील किराणा दुकानात विक्री करणारा अशोक गणेश लाल लोहिया व राज गल्ली बीड येथील किराणा दुकानात विक्री करणारा सय्यद लतीफ सय्यद शहा मोहम्मद यांच्याकडून गुटखा जप्त करण्यात आला. एम एच २३ ४६९८ क्रमांकाची रिक्षा व गुटखा मिळून एकूण दीड लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. तपासात उघडकीस आले की हा गुटखा गेवराई येथील एका व्यक्तीकडून पुरवठा केला जात होता. शहरातील गुटखा विक्री पूर्णपणे बंद व्हावी यासाठी बीड शहर पोलीस ठाणे हद्दीतील सर्व टपरी चालकांना बोलावून गुटखा न विकण्याची सूचना देण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी हनपुडे पाटील, पोलीस निरीक्षक. शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि . बाबा राठोड, पोलीस अमलदार संजय राठोड, सुशेन उगले, मंगेश शिंदे आदींनी केली आहे.

# पाकिस्तान दहतवाद्यांचे केंद्र जयशंकर यांचा संयुक्त राष्ट्रांत हल्लाबोल

**न्यूयॉर्क । वृतसंस्था**

**शनिवारी रात्री भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत भाषण केले. त्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आणि पाकिस्तानचे नाव न घेता म्हटले की आमचा शेजारी दहशतवादाचे केंद्र आहे.**

भारतीय परराष्ट्रमंत्र्यांनी निदर्शनास आणून दिले की तिथे दहशतवाद्यांचा उघडपणे गौरव केला जातो. अनेक दशकांपासून, मोठे आंतरराष्ट्रीय दहशतवादी हल्ले त्या देशातच घडल्याचे आढळून आले आहे. जयशंकर यांनी दहशतवाद्यांना निधी देणे थांबवण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की दहशतवाद्यांच्या पायाभूत सुविधा नष्ट करणे आवश्यक आहे. दहशतवाद्यांशी लढणे हे नेहमीच भारताचे प्राधान्य राहिले आहे. जयशंकर यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत सुधारणा करण्याचे आवाहन केले, ते म्हणाले की संयुक्त राष्ट्रांच्या सदस्यांची संख्या चौपट झाली आहे. आता कायमस्वरूपी सदस्यांची संख्या वाढवली पाहिजे. त्यांनी आपल्या भाषणात इंडिया ऐवजी भारत हा शब्द वापरला. जयशंकर यांनी पहलगाम हल्ल्याचा उल्लेख सीमापार दहशतवादाचे सर्वात अलीकडील उदाहरण म्हणून केला आणि सांगितले की भारताने दहशतवादाविरुद्ध आपल्या लोकांचे रक्षण करण्याचा अधिकार वापरला आहे. ते म्हणाले की स्वातंत्र्यांपासून भारताला अशा शेजारी देशाचा सामना करावा लागला आहे जो दहशतवादाचे जागतिक केंद्र आहे आणि त्याचे नागरिक संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवादी यादीत आहेत. जयशंकर यांनी यावर भर दिला की जेव्हा एखादा देश दहशतवादाला राज्य धोरण म्हणून घोषित करतो, जेव्हा उद्योग पातळीवर दहशतवादी तळ कार्यरत असतात, जेव्हा दहशतवाद्यांचा सार्वजनिकरित्या गौरव केला जातो, तेव्हा अशा हल्ल्यांचा बिनशर्त निषेध केला पाहिजे. जयशंकर म्हणाले की, आपल्याला विशेषत: दहशतवादाशी लढण्याची गरज आहे कारण त्यात धर्मांधता, हिंसाचार, असहिष्णुता आणि भीती यांचा समावेश आहे. जयशंकर म्हणाले की, आपल्याला विशेषत: दहशतवादाशी लढण्याची गरज आहे कारण त्यात धर्मांधता, हिंसाचार, असहिष्णुता आणि भीती यांचा समावेश आहे. जयशंकर म्हणाले की, आपले हक्क सांगत असतानाच, आपण धोक्यांचा धैर्याने सामना केला पाहिजे. दहशतवाद हा एक सामान्य धोका आहे, म्हणून आंतरराष्ट्रीय सहकार्य आवश्यक आहे. जयशंकर यांनी इशारा दिला की जे देश दहशतवादाला प्रोत्साहन देणा-या राष्ट्रांना शिक्षामुक्ती देतात त्यांना शेवटी दहशतवादासारखाच धोका सहन करावा लागेल.

# डिजिटल बँकिंगकडे वाटचाल द्वारकादास मंत्री बँकेच्या सभेत अध्यक्ष डॉ.आदित्य सारडा यांची घोषणा

## डॉ.आदित्य सारडा यांच्या प्रयत्नांतून द्वारकादास मंत्री बँक सक्षम

**बीड । प्रतिनिधी**

**रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे बँकेचा ९ टक्के असल्यास बँक सक्षम असल्याचे मानले जाते मात्र द्वारकादास मंत्री बँकेचा हा ६६.१५ टक्के आहे. बँकेचे नेट वर्थ हे कमीत कमी २ कोटी पाहिजे परंतु बँकेचे नेटवर्थ हे २४ कोटीच्या वर असल्यामुळे बँक आर्थिक दृष्ट्या सक्षम असून लवकरच ग्राहकांना डिजिटल बँकिंग सुविधा देण्यासाठी बँकेकडून कार्यवाही सुरू असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष डॉ. आदित्य सारडा यांनी दिली. व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेची ६३ वी वार्षिक सर्व साधारण रविवार २८ सप्टेंबर रोजी बीड शहरातील बालाजी मंदिर सभागृहामध्ये संपन्न झाली. यावेळी डॉ. आदित्य सारडा बोलत होते.**



सभेला उपाध्यक्ष शुभम चितलांगे, सि.ए.गिरीश गिल्डा, डॉ.आदिती सारडा, अंजली पाटील, डॉ.राहुल खडके, दिनेश देशपांडे, शेख मोहम्मद सलीम, प्रल्हाद वाघ, सुधाकर वैष्णव, राम गायकवाड, सतीश धारकर प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी मोमीन शफियोद्दिन, माजी मुख्यकार्यकारी अधिकारी राधेश्याम सोनी, बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना अध्यक्ष डॉ. आदित्य सारडा म्हणाले की, कठीण काळात बँकेच्या कर्मचारी व संचालक मंडळानी बँकेची धुरा नीट चालवल्यामुळे बँक रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक निर्बधातून पूर्णत: मुक्त झाली. रिझर्व्ह बँकेचे सर्व आर्थिक नियम बँकेने पाळलेले. या सर्व गोष्टीचा परिपाक म्हणून चालू आहवाल वर्षात ऑडीटरने बँकेस ऑडीट वर्ग 'अ' दिलेला आहे. वर्षाअखेर बँकेचे वसूल भाग भांडवल २० कोटीच्या वर असुन बँकेचा एकूण निधी ९२ कोटीच्या वर आहे. त्यामध्ये बँकेचा राखीव निधी १५ कोटी २८ लाख, बुडीत व संशयित निधी ५३ कोटी ५५ लाख, ईमारत निधी २ कोटी ७१ लाख, गुंतवणूक चढउतार निधी १७ लाखाच्या वर बँकेकडे उपलब्ध आहे. बँकेच्या एकूण ठेवी ६३ कोटी च्या वर असून एकूण कर्जे ७९ कोटी ८२ लाख आहे. बँकेची ईतर बँकेतील शिल्लक, रोख शिल्लक व शासकीय रोख्यातील व ईतर बँकेतील गुंतवणूक ८१ कोटी २४ लाख असून त्यामध्ये शासकीय रोख्यातील गुंतवणूक ६० कोटी ११ लाख आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे शासकीय रोख्यामध्ये च्या १८ टक्के गुंतवणूक करावी लागते परंतु बँकेनी केलेली गुंतवणूक ही ९४ टक्के पेक्षा जास्त आहे. यातून ही बँकेची आर्थिक स्थिती किती सक्षम आहे हे सिद्ध होते. बँकेचे निव्वळ एन.पी.ए. चे प्रमाण ०.४२ असून बँकेच्या २० शाखा कार्यरत आहेत. वसुलीचे उत्कृष्ट उदिष्ट पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्याचा बक्षीस देऊन गोरव करण्यात आला. सुत्रसंचलन राधेश्याम सोनी यांनी तर आभार संचालक संतोष लहाने यांनी मानले.

### भक्कम आर्थिक सामर्थ्य असलेले मंत्री बँक

रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे ९ टक्के असला तरी द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेचा तब्बल ६६.१५ टक्के इतका आहे. तसेच नेटवर्थ किमान २ कोटींचे असणे अपेक्षितअसताना बँकेचे नेटवर्थ तब्बल २४ कोटींच्या वर आहे. मार्च २०२५ पर्यंत काटेकोर वसुलीमुळे बँकेचा नेट शून्य टक्के झाला असून ऑडिट अहवालात बँकेस 'अ' वर्ग प्रदान करण्यात आला आहे. या बद्दल अध्यक्ष डॉ. आदित्य सारडा यांनी सर्व संचालकांचे अभिनंदन केले.

### मंत्री बँकेला गुंतवणूक आणि ठेवींची मजबुती

वर्षाअखेर बँकेचे एकूण निधी ९२ कोटींच्या वर असून त्यात राखीव निधी १५.२८ कोटी, बुडीत व संशयित निधी ५३.५५ कोटी, तर इमारत निधी २.७१ कोटी इतका आहे. बँकेच्या एकूण ठेवी ६३ कोटींच्या वर असून कर्जवाटप ७९.८२ कोटी इतके आहे. याशिवाय इतर बँकांमधील शिल्लक व शासकीय रोख्यातील गुंतवणूक ८१.२४ कोटी आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार पैकी १८% गुंतवणूक करणे बंधनकारक असताना द्वारकादास मंत्री बँकेने तब्बल ९४ टक्के गुंतवणूक शासकीय रोख्यात केली आहे. त्यामुळे मंत्री बँकेला गुंतवणूक आणि ठेवींची मजबुती मिळाली आहे.

### मंत्री बँकेच्या या आहेत महत्वाच्या योजना

बुलेट सोने तारण कर्ज योजना, सुलभ पगार तारण कर्ज योजना, छोट्या व मध्यम व्यवसायासाठी कर्ज पुरवठा, वाहतूक कर्ज, बांधकाम कर्ज व व्यापारी कर्ज अशा विविध योजनेमार्फत कर्ज वाटप करण्यात येत आहे याच बरोबर, ग्राहकांसाठी लवकरच डिजिटल बँकिंग सुविधा उपलब्ध होणारा आहे. या शिवाय अन्य काही महत्वाच्या योजना मंत्री बँक ग्राहकांना उपलब्ध करून देत आहे.

## पान ६ वरून...

### पिंपळवंडी-अंमळनेर परिसरात

झाले आहे.घरांचे पंचनामे करावेत व लवकरात लवकर नुकसान भरपाई द्यावी अशी नुकसानग्रस्तांकडून मागणी होत आहे.त्यामुळे गावात रहदारीस अडथळा निर्माण झाला आहे.शासनाने आता शेतातील पिकांच्या पंचनामाच्या भानगडीत न पडता व ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट जास्तीत जास्त नुकसान भरपाई देऊन आधार द्यावा हाच एकमेव पर्याय उरला आहे.तसेच या पावसामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून या संकटातून सावरण्यासाठी पुढील अनेक वर्ष तोंड देण्याची वेळ आलेली आहे.त्यात अनेक अल्पभूधारक,बहुभूधारक शेतकरी शेतीच्या कर्जात कर्जबाजारी आहेत त्यात पावसाने शेतकऱ्यांना पुन्हा कर्जबाजारी करण्याचा खेळ चालविला आहे.या गंभीर परिस्थितीचा सरकारने विचार करून शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी प्रा.अशोक पवार पाटोदा तालुकाध्यक्ष जय हिंद लोकचळवळ,विनोद पवार पाटोदा तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरद पवार गट यांनी केली आहे.

-------------

### देविदास धस यांच्या

आदींचा देखील या पतसंस्थेला मोठे सहकार्य लाभले आहे.पतसंस्थेमध्ये यावेळी श्रीरंग आप्पा कर्डिले भाऊसाहेब निंबाळकर,प्रशांत पोकळे शिवाजी गोरे शहाजी कर्डिले शिवा मार्कंडे, मन्सूर सय्यद, कोकाटे आदी उपस्थित होते.

-------------

### मराठवाड्याला इंडियन मेडिकल

असोसिएशन खांद्याला खांदा लावून उभा आहे ही ग्वाही डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी दिली. कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांची पिके आणि शेतातील मातीही वाहून गेलेली आहे त्यामुळे राज्य शासनाने शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रूपये आपत्कालीन मदत म्हणून जाहीर करावी अशी मागणी डॉ.राजेश इंगोले यांनी एका निवेदनाद्वारे उपविभागीय अधिकाऱ्यांना केलेली आहे. निसर्गनिर्मित या संकटामुळे बळीराजा मानसिक दृष्ट्या खचलेला आहे.झालेल्या नुकसानीमुळे तणावग्रस्त आहे. भविष्याची चिंता लागून राहिलेली आहे. या परिस्थितीमध्ये खचलेल्या या बळीराजाला मानसिक आणि आर्थिक मदतीची गरज आहे याप्रसंगी पूरग्रस्तांच्या मदतीला इतर सर्वांनी धावून जाण्याची गरज आहे. आपल्या परीने जी काही होईल ती मदत या पूरग्रस्त भागातील लोकांना सर्व दानशूर व्यक्तींनी करावी असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे अनेकांना ताण-तणाव येत आहेत. मनामध्ये आत्महत्येची विचार येत आहेत. परंतु ही परिस्थिती लवकरच निवळेल आणि येणाऱ्या भविष्यामध्ये आपल्याला चांगले आयुष्य मिळणार आहे ही आशा मनामध्ये पल्लवीत ठेवायची आहे.आपल्या मनामध्ये जर आत्महत्येचे विचार जास्त प्रमाणात येत असतील तर आपल्या आजूबाजूच्या मित्र परिवाराला मार्गदर्शकांना व नातेवाईकांना याबाबत सांगावे व यावर सविस्तर चर्चा करावी आणी मनमोकळे करावे असेआवाहनही त्यांनी केले. तरीही जर का हे विचार मनात सतत घोळत असतील तर १४४१६ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करावा. हा मोबाईल २४ तास पूरग्रस्तांना समुपदेशन आणि मानसिक ताण तणावापासून दूर ठेवण्यासाठी मार्गदर्शन करेल अशी माहिती डॉ.राजेश इंगोले यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून दिली आहे.

-------------

### नियोजन नसल्याने बीड

लागत आहे. त्यामुळे पाहणी करण्यासाठी आलेल्या वर्षानुवर्षी सत्ता उपभोगलेल्या नेत्यांना जनतेने प्रश्न विचारावेत बीड शहरात कोणकोणत्या भागात पाणी आलेले आहे, याचे अनेक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर दिसत आहेत. अनेक रस्ते जलमय झाले आहेत. लोकांना घरातून बाहेर पडणे देखील मुश्किल झाले आहे. याला जे जबाबदार आहेत, त्यांना जनतेने प्रश्न विचारले पाहिजेत. जनतेने त्यांच्या दारात जाऊन सत्तेचा उपभोग कसा घेतला, याबाबत विचारायला हवे. शहरातील अनेक नदी नाले यांना नाल्यांचे स्वरूप आणले गेले आहे. यातून बेकायदेशीर रितीने लहान लहान रस्ते सोडून नगरपालिकेच्या कृपेने बांधकाम झालेले आहे. नगर पालिकेतील भ्रष्ट कारभार आणि वेगवेगळ्या ठिकाणी जागा गिळंकृत करणे, यासारख्या उद्योगांचे परिणाम आता जनतेला भोगावे लागत आहेत अशातच आता वर्षानुवर्षी सत्ता भोगणारे अनेक जण जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी पाण्यात जात असल्याचे चित्र पाहिल्यानंतर त्यांची किव येते. जनतेने वर्षानुवर्ष सत्ता उपभोग करणाऱ्यांना या काळात गल्ली बोळात आल्यानंतर प्रश्न विचारून त्याचे व्हिडिओ व्हायरल करणे आवश्यक आहेजोपर्यंत शहरातील जनता जागृत होत नाही, तोपर्यंत या समस्या सुटणार नाहीत. त्यामुळे विकासाच्या गाथा गाणाऱ्यांना भूतलावर आणून जनतेच्या अडचणी दाखवल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे गल्ली बोळातील नागरिकांनी विकास पुरुषांच्या घरी जाऊन त्यांनी नियोजन काय केले ? याबाबत स्पष्ट विचारणा करायला हवी. जनता नगर पालिकेला टॅक्स देते. जनतेला सुविधा पुरवणे हे नगर पालिकेचे काम आहे. त्यामुळे सुविधा मिळत नसतील, तर त्याविषयी देखील जनतेने आवाज उठवावा, असे आवाहन ॲड. अजित देशमुख यांनी केले आहे.

-------------

### मच्छिमार भोई कुटुंबांना

इंजिनिअर बिडकर बांधकाम विभागः धोंगडे,शिंदे,भोसले ग्रामीण पाणी पुरवठा विभाग : सलगर एस डी, रोडे.एस.के.यांनी पूरपरिस्थिती पाहणी साठी भेट दिली, यावेळी जिल्हातील भोई समाजातील व्यक्तींचे जीवनावश्यक वस्तू होडी जाळे बोटी व नुकसानीचे पंचनामा तात्काळ करून घ्या अशा सूचना दिल्या आहेत.

**पालकमंत्री अजितदादा मच्छिमार भोई समाजाकडे लक्ष देतील का ?**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ५००० आणि धान्य अशी मदत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर केली पण जिल्ह्यातील माजलगाव धरणांसह,अन्य गोदावरी,सिंदफणा, बिंदुसरा व अन्य नद्या काठी आपली छोटी छोटी पालं ठोकून आपले पोटाची खळगी भरण्यासाठी नदी,धरणाकाठी अधिवास करतात परंतु ढगफुटी सदृश्य झालेल्या पावसामुळे व पुरामुळे मच्छिमारांची जाळी,होळी व संसारोपयोगी वस्तू वाहून गेली आहेत, भोई समाजातील प्रत्येक कुटुंबाला ५० हजार रुपये भरीव मदत मिळवून देण्यासाठी पालकमंत्री म्हणून काय निर्णय घेतात याकडे जिल्ह्यातील मच्छीमार भोई समाजाचे लक्ष लागले आहे.

-------------

## पान १ वरून...

### ज्याच्या घरात पाणी शिरले

भागांत जनावरांच्या चाऱ्यांची समस्या निर्माण झाली असून, त्यावर उपाययोजना करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ चारा पुरवठ्याचे आदेश दिले असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. पुरस्थितीमुळे नुकसान झालेल्या पिकांचे सरसकट पंचनामे करण्याचे निर्देश देऊन, पंचनामे करताना कायद्याच्या अटींवर लोकांना त्रास होऊ नये. सरसकट पंचनामे करण्याचे निर्देश दिले. राज्याला नुकसानीचा अहवाल आल्यानंतर मदतीबाबतचा अंतिम निर्णय जाहीर केला जाईल. पूरग्रस्तांना शक्य तितकी मदत करण्याची राज्य सरकारची तयारी आहे. नागरिकांना कुठलाही त्रास होणार नाही यासाठी प्रशासन सज्ज आहे, असे फडणवीस म्हणाले.

-------------

### तीन दिवसांचे विशेष अधिवेशन

वर्षभर राबला तरी परिस्थिती स्थिरस्थावर होणार नाही असे दिसते अशी भीतीही यावेळी व्यक्त केली.

-----------

### शिर्डीच्या साईबाबा संस्थानकडून

आहेत. तर शिर्डीच्या साईबाबा संस्थानने आपल्या सामाजिक जबाबदारीचे उत्तम उदाहरण दाखवून संकटग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे. साईबाबा संस्थानने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी एक कोटी रुपये देण्याची घोषणा केली आहे. या निधीचा वापर राज्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीवर तातडीने मदत पुरवण्यासाठी केला जाणार आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये शेतीला मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतकऱ्यांचे घरबार विस्कळीत झाले आहेत. अशा वेळी साईबाबा संस्थानने आपल्या सामाजिक बांधिलकीचा परिचय देत मदत जाहीर करणे महत्वाचे ठरले आहे.

----------

### गोदाकाठच्या नागरिकांना

नये यासाठी सतर्क राहण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत काही नदीकाठच्या गावांना स्थलांतरित करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती विशेषता गेवराई तालुक्यातील जवळपास ३२ गावांना स्थलांतरित होण्याचे निर्देश दिले आहेत.

----------

### राज्यातील वीज कर्मचारी

तिन्ही वीज कंपन्यांमध्ये कोणत्याही पद्धतीचे खासगीकरण करण्यात येणार नाही, उलट या कंपन्यांच्या आर्थिक बळकटी करता राज्य शासन ५० हजार कोटींचे अर्थसहाय्य करेल, असे कामगार संघटना प्रतिनिधींसोबत संयुक्त पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले होते. मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर कृती समितीने ४ जानेवारी २०२३ रोजीचा संप स्थगित केला होता; परंतु मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाचा भंग करत तिन्ही वीज कंपन्यांच्या प्रशासनाने विविध मार्गाने खासगीकरणाची प्रक्रिया सुरू केलेली आहे. खासगीकरण व इतर प्रलंबित विषयांकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ९ ऑक्टोबरला एक दिवसाचा संप करण्याचा निर्णय कृती समितीने जाहीर केला आहे.

----------

### संघाने गांधी विचार

विचार व भारताचे संविधान स्वीकारावे, असे आवाहन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे. नागपूर येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणाले की देशाच्या स्वातंत्र्यासाठी महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली देश एकवटा होता. राजकीय व्यवस्था परिवर्तनाबरोबच सामाजिक परिवर्तन ही काँग्रेसची भूमिका होती तर मुठभर लोकांच्या हातात सत्ता असावी ही संघाची भूमिका होती.

--------

### भाजपाच्या दबावामुळे युती

काय आहे, ज्यामुळे काँग्रेस भाजपाला घाबरत आहे? अशी प्रश्नांची सरबतीही यावेळी केली. प्रकाश आंबेडकर यांच्या या वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय वर्तुळात नवे चर्चासत्र रंगले असून, काँग्रेस आगामी निवडणुकांसाठी वंचित बहुजन आघाडीसोबत युतीसाठी हात पुढे करणार की नाही, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

-----------

### पंतप्रधानांच्या हस्ते बीएसएनएलच्या

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सांस्कृतिक कला मंदिर, येरवडा येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

-------------

### अर्चना कुटेच्या

अटक केली. त्यांना न्यायालयाने २८ सप्टेंबर पर्यंत कोठडी सुनवली होती. रविवारी त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी वाढवून दिली.

----------

### राज्यातील ८९ फार्मसी

या महाविद्यालयांमध्ये अग्निसुरक्षा प्रमाणपत्रांचा अभाव, इमारत भोगवटा प्रमाणपत्रांचा अभाव यामुळे या कॉलेजची मान्यता रद्द करण्याची शिफारस केली. या शिफारशीच्या आधारे, २०२५-२६ शैक्षणिक वर्षाच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेत या संस्थांना सहभागी होण्यास मनाई करणारे परिपत्रक जारी करण्यात आले.

--------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. २९ सप्टेंबर २०२५





माजलगाव :फ्लाईंग बर्ड्स अकॅडेमी मध्ये नवरात्र महोत्सवात ज्यू. के.जी.तील विद्यार्थिनी कु.अन्वी प्रशांत शेटे हिने माँ दुर्गेची वेशभूषा सादर केली.

## थोडक्यात...

### प्राणी मित्र गणेश खाडे यांनी विहिरीत पडलेल्या हरणाला दिले जीवदान

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील नागेश वाडी शिवारात एका विहिरीत हरीण पडले होते गणेश खाडे याना फोन येतात त्यांनी त्या ठिकाणी धाव घेतली विहिरीत पडलेल्या हरणाचा गणेश खडे मेजर यांनी विहिरी उडी घेतली हरणाल बाहेर काढून हरणाच जिव वाचवला या आधी



त्यांनीच करंजवण येथे आशाच एका हरणाचा जिव वाचवला होता कुत्र्याच्या तावडीतून सुटका केली होती गणेश खाडे फौजी यांनी देश सेवा करून आल्यानंतर ते आता तुमच्या प्राण्यांची सेवा करत आहेत ते प्राणी मित्र म्हणून त्यांची आता ओळख होत चालली आहे त्यांच्यासोबत त्यांची टीम पण होती गावकरी पण उपस्थित होते गणेश खाडे फौजी ज्ञानेश्वर भारती. शंभू भारती. सुनील थोरवे. भागवत थोरवे. हनुमंत थोरवे. कोंडीबा सानप इत्यादी लोक उपस्थित होते. या कामगिरीने सर्वत्र कौतुक होत आहे

### लक्ष्मीबाई गायकवाड यांचे निधन

म्हसोबावाडी । प्रतिनिधी



तालुक्यातील खुंटेफळ येथील लक्ष्मीबाई नारायण गायकवाड वय ८१ यांचे गुरूवार दि. २५ सप्टेंबर रोजी दुपारी ५.२० वाजेच्या दरम्यान अल्पशा आजाराने त्यांच्या राहत्या घरी निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर खुंटेफळ येथील स्मशानभूमीत रात्री ९ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे.सुनिल गायकवाड यांच्या त्या मातोश्री होत्या.

### रा.स्व. संघ प्रणित सेवाभारती, बजरंग दल, यांचे वतीने पूरग्रस्तांना मदत

आष्टी । प्रतिनिधी

देशामध्ये ज्या ज्या वेळी नैसर्गिक आपत्ती येते त्यावेळी राष्ट्रीय सेवक संघ स्वयंसेवक धडाडीने पुढे येऊन संकट दूर असताना मदत करत असतात त्याचाच एक भाग म्हणून नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे आष्टी तालुक्यातील काही गावांमध्ये पूर परिस्थिती निर्माण होऊन नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे त्यांना आधार देण्याचे काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रणित सेवा भारती आणि बजरंग दल यांचे वतीने दिनांक १८/९/२५ रोजी धामणगाव, पानाची देवळाई, घाटापिंपरी, सुलेमान देवळा, कडा, देविनिमगाव येथे भांड्याचे किट वाटप केले. बजरंग दल बीड जिल्हा यांनी १७/९/२५ रोजी धामणगाव, पानाची देवळाई, घाटा पिंपरी येथे १०० किराणा किट वाटप केले व नंतर साडी व ब्लँकेट वाटप केले.



### सामाजिक शांततेसाठी सद्भावणेची गरज डॉ.काकडे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले २३ सप्टेंबर २०२५ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या१५० जयंतीनिमित्त सरदार वल्लभभाई पटेल यांची सदभावणीचे विचार या विषयावर प्राध्यापक डॉक्टर शिवाजीराव काकडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक बापू प्राध्यापक प्रवीण शिलेदार सर डॉ रामकृष्ण प्रधान सर पापाजी चव्हाण प्राध्यापक नारायण फुने व्यासपीठावर उपस्थित होते सर्वप्रथम वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राध्यापक डॉ लोखंडे यांनी केले प्रमुख मार्गदर्शन करताना प्राध्यापक काकडे सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यांनी आपल्या मनोगत सरदार वल्लभभाई पटेल यांनी आपल्या विचारातून व कार्यातून देशात सदभान निर्माण करण्याचे काम केले आजच्या काळात देशात सामाजिक शांतता टिकवण्यासाठी सरदार वल्लभभाई पटेल यांचे सद्भावना विचार अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन डॉक्टर काकडे यांनी केले या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉक्टर प्रवीण शिलेदार यांनी मार्गदर्शन केली त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमाची आभार प्राध्यापक पापाजी चव्हाण यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ संदीपान कीवने यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाची स्वीकारण्यासाठी स्वयंसेवकांनी विशेष प्रयत्न केले.

# दूध उत्पादकांनी भ्रूण प्रत्यारोपण या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन उत्पादकता वाढवावी -आमदार सुरेश धस

## परराज्यातील प्रजातीबाबत युवकांनी सजग राहून फसवणूक टाळावी -अरविंद पाटील

आष्टी । प्रतिनिधी

दूध उत्पादक शेतकऱ्यांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून भ्रूण प्रत्यारोपण या नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्याच गोठ्यात नवीन प्रजाती निर्माण करून जास्तीत जास्त दूध उत्पादन होईल यासाठी प्रयत्न करावेत... असे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले..

तसेच महाराष्ट्रातील तरुण दूध उत्पादन व्यवसायाकडे येत आहेत परंतु त्यांनी सोशल मीडियावरील माहितीवरून परराज्यातून गाई म्हशींच्या बाबत या माहिती आधारे आर्थिक गुंतवणूक करू नये त्यातून फसवणूक होण्याचे अनेक उदाहरणे घडली आहेत त्यामुळे त्यांनी सजग राहून फसवणूक टाळावी.. असे आवाहन कोल्हापूर येथील वाय.टी.पाटील डेअरी फार्म चे संचालक अरविंद पाटील यांनी केले.आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ यांचे वतीने आयोजित दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या मेळाव्यामध्ये मार्गदर्शन करताना आमदार सुरेश धस आणि अरविंद पाटील बोलत होते.या वेळी प्रास्ताविक डॉ. जालिंदर वांढरे,डॉ. मंगेश ढेरे पशुधन विकास अधिकारी यांनी केले.यासह पशु प्रजननातील अद्यावत तंत्रज्ञान, भ्रूण प्रत्यारोपण याबाबत डॉ. विष्णू जवणे ( पशुधन विकास अधिकारी




पुणे) यांनी उपस्थित पशुपालक यांना मार्गदर्शन केले. यावेळी मंचावर चेअरमन शांतीलाल भोसले, -तालुका दुध उत्पादक संघ,माजी नगराध्यक्ष श्री.रंगनाथ धोंडे,आत्माराम फुंदे, शिवाजी घोलप,यांचेसह दूध संघाचे सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.यावेळी कार्यकारी संचालक मच्छिंद्र धनवडे,मोहन झांबरे, दिनकर दाणी व संघ कर्मचाऱ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले परिश्रम घेतले.पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की, आष्टी मतदार संघात या पूर्वी दूध व्यवसाय कमी प्रमाणात होता परंतु आष्टी तालुका दूध संघाच्या योग्य धोरण व सकारात्मक निर्णयामुळे आज आष्टी तालुका दोन लाख लिटर्स पेक्षा जास्त दूध उत्पादन करण्यामध्ये अग्रेसर झालेला असून तालुक्यातील शेतकरी नवनवीन गाई व म्हशींच्या प्रजातीचे पालन करत जास्तीत जास्त दूध उत्पादन करण्याकरिता वेगवेगळ्या प्रयोग करत आहेत, त्याचबरोबर सर्व शेतकऱ्यांनी गाई व म्हशींची प्रजननातील अद्यावत तंत्रज्ञान सेक्स सोर्टेड सिमेन्स (भ्रूण प्रत्यारोपण) या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपल्या गाई व म्हशींची दूध उत्पादकता वाढवावी यासह दूध उत्पादकता वाढवण्याबरोबरच ब्रीडिंग मॅनेजमेंट करून नवीन प्रजातीच्या गाई निर्माण करणे आवश्यकता आहे... त्यासाठी पशूला मुरघास याचबरोबर ओला -चारा व मॉइश्चर मिक्सर यासह शुद्ध पाणी व वेळेवरती औषध उपचार या सर्व बाबी महत्त्वाच्या आहेत त्याकरिता सर्व शेतकऱ्यांनी जागरूक व सजत राहणे आवश्यक आहे यासह येणाऱ्या काही काळामध्ये ब्रीडिंग व डेअरी फार्म च्या माध्यमातून मतदार संघामध्ये महत्त्वपूर्ण प्रकल्प राबवून नवतरुणांना या क्षेत्रामध्ये आकर्षित करून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मनुष्यबळ कमी वापरून जास्तीत जास्त आर्थिक फायदा शेतकऱ्यांना व पशुपालकांसह नव तरुणांना फायदा होईल याकरिता सकारात्मक धोरण घेण्याचे सांगितले.

## अभ्यास व खेळाची सांगड घातल्यास उद्याचे यश तुमचे -डॉ.बळीराम राख

पाटोदा । प्रतिनिधी

येथील वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या इनडोअर बॅडमिंटन हॉल मधे स्पर्धा संपन्न. येथील कनिष्ठ विभाग व तालुकास्तरीय क्रीडा कार्यालयच्या वतीने आयोजित केलेल्या स्पर्धेचे उद्घाटन वसंतदादा पाटील महाविद्यालायचे कर्तव्यदक्ष प्राचार्य.डॉ. प्रोफ़ेसर बळीराम राख यांनी केले. खेळाडूंना मार्गदर्शन पर बोलताना मा. प्राचार्य एक खेळ व अनेक विषयचा अभ्यास केल्यास त्या खेळाडुचे जीवन यशवंत ठरते व अश्याच तालुकास्तरापासून राष्ट्रीयस्तरापर्यंत मेहनतिने चिकाटीने सराव केल्यास अंतरराष्ट्रीयस्तराचे दरवाजे नक्कीच उघडतात. या दरवाज्यातून



पहिल्यास यशाचे शिखर खुप जवळ दिसते म्हणून खेळाडु मित्रांनो एक खेळ निवडून त्याला वेळ द्या व एकाग्रतने अभ्यास करा उद्याच यश तुमचेच आहे. या स्पर्धेमधे ६ मुलांचे व ४ मुलींच्या संघाने सहभाग घेतला. या स्पर्धेचे आयोजन तालुका क्रीड़ा अधिकारी अविनाश पाटील कनिष्ठ क्रीड़ा विभाग प्रमुख प्रा. डॉ. तानाजी आगळे यांनी केले. या स्पर्धेसाठी पुढील मान्यवर उपस्थित होते प्रा. श्री. गोपाल धांडे, उपप्राचार्य. डॉ. सतीश मालूँगे, उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, श्री. संदीप जावळे सर, श्री. प्रवीण मंडलिक, श्री. विष्णु नागरगोजे सर व इतर उपस्थित होते.

## बालाजी मंदिरात ब्रम्होत्सव व चतुर्थ वर्धापनदिना निमित्ताने श्री सहस्त्र कलशाभिषेकाचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील बालाजी मंदिर येथे ब्रम्होत्सव चतुर्थ वर्धापनदिना निमित्ताने श्री.सहस्त्र कलशाभिषेकाचे आयोजन बालाजी सेवा फाऊंडेशनच्या वतीने भव्य आयोजन करण्यात आले आहे



दि ४,५ व ६ ऑक्टोबर रोजी तीन दिवशीय उत्सव साजरा करण्यात येणार आहे यात हा ब्रम्होत्सवा निमित्ताने मंत्रपुष्पांजली सह ,अर्चना पुजन होनार असुन हा कार्यक्रम अत्यंत मोठ्या स्वरूपात होत आहे.दि ०४ ऑक्टोंबर शनिवार रोजी शहरातील झेंडा चौक येथुन आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बालाजी मंदिर असे भव्य शोभायात्राचे आयोजन केले आहे या शोभायात्रेत हजारो समाज बांधव,व भक्तपरिवाराचा सहभाग राहणार आहे.तसेच या दिवशी श्री.सहस्त्र कलाशाभिषेक विधी प्रथम दिवशी सकाळी ०९:०० वाजता होईल. बालाजी सेवा फाऊंडेशनचे च्या वतीने करण्यात येणार आहे.

दि ०५ ऑक्टोंबर रविवार रोजी सकाळी ७:०० ते ९:०० या वेळेत १००० महिलांच्या हस्ते विषुसहस्त्रनाम व व्यंकटेश स्तोत्र चे पठण होईल.सकाळी ९:०० वाजता स्थापित देवता पूजन, शांती होम, पूर्णाहुती विष्णु सहस्त्रनाम जप व कलशाभिमंत्रण होईल.दि ०६ ऑक्टोबर सोमवारी शेवटीच्या दिवशी कोजागिरी पौर्णिमा निमित्ताने श्री भगवान व्यंकटेशास सहस्त्र कलशाभिषेक,त्रिशोपचार महापुजन, ध्वजारोहण, नैवेद्य महाआरती व महाप्रसादाचे आयोजन सायंकाळी ६:०० वाजता करण्यात आले आहे महाप्रसादाचे यजमान रामस्वरूप खंडेलवाल व कारभारी काळे हे आहेत या प्रसादाचा व त्रिदिवशी कार्यक्रमाचा सर्व भक्तांनी लाभ सर्वानी घेण्याचे आवाहन श्री.बालाजी सेवा फाऊंडेशनचेच्या वतीने करण्यात आले आहे.

## विविध मागण्यांसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा मंगळवारी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर मोर्चा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट मदत, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्ज माफी या व अशा विविध मागण्या घेऊन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) पक्षाचा भव्य मोर्चा मंगळवार, दिनांक ३० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे निघून तो उपजिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे अशी माहिती मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांनी दिली आहे. याबाबत त्यांनी प्रशासनाला निवेदन दिले आहे.



याबाबत अधिक माहिती देताना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) पक्षाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांनी सांगितले आहे की, मागील काही दिवसांपासून बीड जिल्ह्यासह अंबाजोगाई तालुक्यातील सर्वच महसूल मंडळात अतिवृष्टी झालेली असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. नुकतीच आम्ही अंबाजोगाई तालुक्यातील ग्रीनबेल्ट आणि डोंगरपट्ट्यातील शेतकऱ्यांच्या शेतपिकांच्या नुकसानीची माहिती घेतली. त्यानुसार शेतपिक व फळबागांचे नुकसान, शेतजमीन खरडून जाणे, शेती-शेतपिक व फळबागांचे पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई मिळणे, घरांची पडझड, स्थलांतरीत कुटूंबांना आर्थिक मदत करणे, वैयक्तीक नुकसान, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, पिक विमा, अनेक भागातील विज पुरवठा बंद आहे. संजय गांधी/श्रावणबाळ योजनांचे लाभार्थी यांचे मानधन थकले आहे, मांडवा (पठाण), ता.अंबाजोगाई (जि.बीड) येथे गायरानधारक शेतकऱ्यांचा पोटखराबा रद्द करून वहितीची नोंद तात्काळ करून घेण्यात यावी, बीड जिल्ह्यातील गायरानधारक कसत असलेल्या जमीनीवर शासनाने कसल्याही प्रकारच्या प्रकल्पांना मंजूरी देऊ नये, यासह अंबाजोगाई तालुक्यातील तहसीलदार यांना निवेदन देऊन ओला दुष्काळ जाहीर करून त्याअनुषंगाने विजबील वसूली, कर्ज वसूली करू नये, शैक्षणिक शुल्क माफ करावे. अशा व या अनुषंगाने दुष्काळाच्या सर्व सवलती लागू करण्यात याव्यात. झालेल्या सर्व नूकसानीचे सरसकट पंचनामे तातडीने करण्यात यावेत. शासन निर्णयाप्रमाणे तात्काळ जिरायती, बागायती फळबागांसाठी नुकसान भरपाई देण्यात यावी, शेतकऱ्यांसोबतच शेतमजूर बांधवांना ही तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी अशी विनंती आम्ही शासन व प्रशासनाला देण्यात आलेल्या निवेदनात केली आहे. सदरील निवेदनाच्या प्रतिलिपी माहितीस्तव तहसिलदार व पोलीस निरीक्षक (अंबाजोगाई शहर) यांना देण्यात आलेल्या आहेत. असे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे. तसेच या प्रश्नांवर मंगळवार, दिनांक ३० सप्टेंबर रोजी काढण्यात येणाऱ्या मोर्चात शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी आणि मानधनापासून वंचित असलेल्या विविध शासकीय योजनांचे लाभार्थी यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) पक्षाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे, बीड जिल्हाध्यक्ष जीवन गायकवाड, मराठवाडा प्रवक्ता धिमंत राष्ट्रपाल, महिला जिल्हाध्यक्षा मिनाताई लोंढे, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष बादल तरकसे यांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर टाळून करिअरकडे लक्ष द्यावे -प्राचार्य महेश मस्के

**आष्टी । प्रतिनिधी**

**अलीकडील काळामध्ये विद्यार्थ्यांची वाचन क्षमता कमी होत चालली आहे. वाचनापासून विद्यार्थी दुरावत चालला आहे याचे मुख्य कारण म्हणजे मोबाईलचा अति वापर.मोबाईलच्या अतिवापराने करिअरचे वाटोळे होत असून विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर टाळून करिअरकडे लक्ष देण्याचे आवाहन अमोलक डी.फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य महेश मस्के यांनी केले.**

ते कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या रसिकलाल एम. धारिवाल डी फार्मसी महाविद्यालयात जागतिक औषध निर्माता दिनानिमित्त आयोजित केलेल्या पालक मेळाव्यात बोलत होते. पुढे



बोलताना मस्के म्हणाले की,औषध निर्माणशास्त्रामध्ये करिअर साठी खूप मोठ्या संधी आहेत. या मधून विद्यार्थी स्वावलंबी होत असून व्यवसायासाठीही अनेक संधी आहेत. अमोलक डी.फार्मसी महाविद्यालयाने आजपर्यंत शेकडो विद्यार्थी घडविले असून अनेक जण मोठ मोठ्या पॅकेजवर नामांकित कंपनीमध्ये नोकरीस आहेत तर शेकडो जणांनी स्वतःचे व्यवसाय उभारून करिअर घडवले आहे. डी फार्मसी केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये बेरोजगार कोणीही राहत नाहीत.वृत्तपत्रे वाचणे ही काळाची गरज असून जगातील घडामोडी त्यामुळे कळतात. मोबाईलवर व गुगल वर भरवसा ठेवू नका. विद्यार्थ्यांनी करिअर घडवण्यासाठी मोबाईल पासून दूर राहून आपले ध्येय साध्य करण्याचे आवाहन महेश मस्के यांनी केले.यावेळी कडा शहरातील नोंदणीकृतऔषधनिर्माता यांचा सत्कार आणि पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आला.प्रसंगी पालक बशीर,अत्तार अकिल शेख,देसाई,गोलहार यांच्यासह नोंदणीकृत औषध निर्माते अभय मेहेर, डॉ. सीमा शरद चव्हाण , राम ढोबळे, प्रवीण सटाले ,दत्ता दिवटे,राहुल कर्डीले कार्यालयीन अधीक्षक शोभचंद ललवाणी , सुजाता गरुड, रियाझ शेख, अर्षदली सय्यद, वंदना कोल्हे, वैष्णवी कर्डीले,वंदना सागडे, कुलभूषण ललवाणी,आनंद पोखरणा, सोमा साबळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैष्णवी कर्डीले ,वंदना कोल्हे यांनी केले.

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६

जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-५९१

दिनांक - / /२०२५

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती राहुल बळीराम राठोड रा. रामनगर तांडा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | आरवी राहुल राठोड | मुलगी | २२/०८/२०२२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- / /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड

## सेवा पंधरवाडा अंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त किट्टीआडगाव येथे भव्य आरोग्य शिबिर

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील किट्टी आडगाव मंडळ येथे नुकतेच माजलगाव भाजपाच्या वतीने सेवा पंधरवडा अंतर्गत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य सर्व रोगनिदान शिबिर संपन्न करण्यात आले.

या शिबिरामध्ये विविध रक्ताच्या चाचण्या घेऊन विविध आजारावर उपचार करण्यात आले तसेच

भव्य स्वरुपात नमो नेत्र संजीवनी अभियान! राबविण्यात आले. या शिबिरामध्ये महिलांचा जास्त सहभाग नोंदवला गेला,स्वस्थ नारी सशक्त परिवारचया अनुषंगाने महिलांच्या विविध रक्ताच्या तपासण्या करून उपचार करण्यात आले. कीट्टी आडगाव येथे मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या मार्गदर्शनामध्ये




कीट्टीआडगाव येथे स्वस्त नारी सशक्त परिवार नमो नेत्र संजीवनी शिबिर आयोजित करण्यात आले होते.५०० पेक्षा जास्त गरजू रुग्णांनी विविध तपासण्या करून विविध उपचार घेत या आरोग्य शिबिर सेवेचा लाभ घेतला . कीट्टीआडगाव येथील ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. कदम आणि डॉ.काळे यांचे आणि त्यांच्या स्टाफचे विशेष सहकार्य या आरोग्य शिबिरास लाभले.

या आरोग्य तपासणी शिबिरासाठी दंतरोग तज्ञ , नेत्ररोग तज्ञ व स्त्री रोग तज्ञ यांनी रुग्णांना सेवा दिल्या.यावेळी रूपाली शरदर कचरे यांनी महिला वयोवृद्ध व लहान मुले यांच्या आरोग्य, जनजागृती आणि स्थानिक समस्यांवर संवाद साधून सेवा पंधरवडा निमित्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त हे विविध आजारावर आरोग्य शिबिर आम्ही घेत आहोत असे सांगत मोदी हे आपल्या परिवारातीलच आहेत कारण मोदी हे देशातील सर्व नागरिकांना आपल्या परिवारातील मानतात आणि म्हणून त्यांचा वाढदिवस हा अशा विविध उपक्रमांनी साजरा केला जावा या उद्देशाने भारतीय जनता पार्टीच्या वतीने संपूर्ण भारत देशामध्ये अशी विविध समाज उपयोगी भव्य दिव्य स्वरूपात विविध कार्यक्रम घेतले जात आहेत.

यावेळी भाजपा ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर मेंडके,डॉ.अशोक तिडके,सौ रुपाली शरदराव कचरे, डॉ.प्रशांत पाटील, विनायक रत्नपारखी,डॉ अभिजीत सोळंके, ईश्वर खुरपे,सरपंच रुक्मानंद खेत्रे,नाना आगे,शरद कचरे, प्रदीप जाधवर, सचिन तौर,सुधाकर रासवे,अशोक शिंदे, दीपक गरड,अनंत जगताप, सिध्देश्वर राठोड,खय्युम पठाण,बाळासाहेब क्षीरसागर,रामेश्वर चव्हाण यासह अनेक भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६

जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-५९२

दिनांक - / /२०२५

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती राहुल बळीराम राठोड रा. रामनगर तांडा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | राजवीर राहुल राठोड | मुलगा | ०७/११/२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- / /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड

cmyk

राज्य लोकतंत्र शेत-शिवार
सोमवार दि.२९ सप्टेंबर २०२५
४

# पावसामुळे राज्यातील २२ लाख हेक्टरहून अधिक पिके पाण्याखाली

## सर्वाधिक नुकसान बीड जिल्ह्यात, शेतकरी हवालदिल, तात्काळ मदतीची गरज

पुणे : राज्यात सप्टेंबर महिन्यात पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तर मागील दोन ते तीन आठवड्यापासून सुरू असलेल्या पावसाने मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रात पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, केवळ सप्टेंबर महिन्यातील २६ दिवसांत राज्यातील २२ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र बाधित झाले आहे. यामध्ये सर्वांत जास्त नुकसान हे बीड जिल्ह्याचे झाले आहे.


मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला असून यामुळे पीके मातीसह वाहून गेले आहेत. तर घरे, दुकाने पाण्याखाली गेले असून राज्यात आत्तापर्यंत ५७ हजारांपेक्षा जास्त पशुधन मृत्युमुखी पडले आहे. यासाठी



सरकारने नुकसान भरपाईची घोषणा केली आहे पण शेतकऱ्यांना किती पैसे मिळणार यासंदर्भात शेतकऱ्यांच्या मनात संभ्रम निर्माण झाला आहे. सर्वांत जास्त नुकसान हे बीड जिल्ह्यामध्ये ५ लाख ७१ हजार १०० हेक्टर एवढे झाले असून कापूस, सोयाबीन, तूर, मूग, उडीद, बाजरी, भुईमूग, मका, ऊस, कांदा, भाजीपाला व फळपिके या पिकाचे झाले आहे. तर येथे केवळ ११ दिवसांमध्ये म्हणजे १३ ते २४ सप्टेंबर यादरम्यानच एवढे नुकसान झाले आहे.

कोणत्या जिल्ह्यात किती नुकसान? (२७ सप्टेंबर रोजीचा अहवाल) बीड – ५ लाख ७१ हजार १०० हेक्टर जालना – २ लाख ७३ हजार ८६१ हेक्टर छत्रपती संभाजीनगर – १ लाख ६६ हजार २२६ हेक्टर धाराशिव – १ लाख ८१ हजार २०० हेक्टर अहिल्यानगर – ३ लाख ७ हजार ७४५ हेक्टर सोलापूर – ३ लाख ५१ हजार ४३७ हेक्टर यवतमाळ – १ लाख ३७ हजार ५६८ हेक्टर.

# दुधी भोपळा लागवड या चुका टाळा!



महाराष्ट्रात भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. भाजीपाल्याला बाजारात बाराही महिने मागणी असते. त्यामुळे त्यास बऱ्यापैकी भाव देखील मिळतो. ज्यामुळे शेतकऱ्यांना भाजीपाला पिकांमधुन पारंपारिक पिकांपेक्षा नेहमीच चांगले आर्थिक उत्पन्न मिळते. भाजीपाल्यामध्ये काही शेतकरी हे दुधी भोपळ्याची लागवड करतात. मात्र, भोपळा पीक घेताना त्याच्या चवीबाबत शेतकऱ्यांना सर्वात मोठी समस्या असते. अर्थात शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला भोपळा हा चवीला कडू लागत असेल, तर अशा भोपळ्याच्या उत्पादनानंतर त्यास ग्राहक मिळणे कठीण असते. परिणामी, शेतकऱ्यांनी भोपळा पीक घेताना कोणती काळजी घेतली पाहिजे, जेणेकरून उत्पादित भोपाळ हा कडवट लागत नाही.

भोपळा कडू का लागतो :कधी–कधी भोपळ्याचे उत्पादन घेताना काही गोष्टींकडे दुर्लक्ष झाल्यास, उत्पादित भोपळा कडू लागतो. यात प्रामुख्याने थंड हवामान असलेल्या किंवा मग समुद्रसपाटीपासून अधिक उंच असलेल्या भागांमध्ये शेतकरी भोपळा उत्पादन घेत असतील. तेव्हा ही समस्या जाणवते. याशिवाय वातावरणातील बदलांमुळे देखील ही समस्या जाणवत असते. यात तापमानात चढ–उतार, भोपळा लागवड केलेल्या जमिनीचा सामू कमी असणे, किंवा मग अचानक भोपळा पिकाला पाण्याच्या ताण पडणे ही प्रमुख कारणे असतात. याशिवाय लागवड केलेल्या जमिनीमध्ये पोषकतत्वे कमी असल्यास, याशिवाय तोडणी केल्यानंतर बाजारात नेईपर्यंत अयोग्य पद्धतीने हाताळणी करणे ही देखील कारणे त्यास कारणीभूत असतात. इतकेच नाही तर सायन्टिफिकदृष्ट्या शेतकऱ्यांनी केलेल्या भोपळ्यामध्ये कुकुर्बिटासिन या घटकाचे प्रमाण अधिक असेल. तर भोपळ्याला कडवटपणा लागतो.

करा 'हे' महत्वाचे उपाय :भोपळा लागवड करताना शक्यतो मांडव पद्धतीने शेडनेट उभारणे आवश्यक ठरते. ज्यामुळे वातावरणीय बदलाचा परिणाम होत नाही. सामू ५.५ ते ७ पर्यंत असलेल्या जमिनीची भोपळा लागवडीसाठी निवड करावी. भोपळा पिकाला उच्च तापमानाचा फटका बसणार नाही, याची काळजी घ्यावी. याशिवाय लागवडीनंतर काढणीपर्यंत पिकाला पाण्याचा ताण पडू देऊ नये. जमिनीत पोषकतत्वे कमी असल्यास वेळोवेळी खतांची मात्रा द्यावी. काढणीनंतर भोपळ्याची सुयोग्य पद्धतीने हाताळणी करावी. भोपळ्यामध्ये कुकुर्बिटासिनचे प्रमाण कमी राहू नये, यासाठी शेतकऱ्यांनी भोपळ्यास नायट्रोजन खतांचा वापर करणे गरजेचे असते.

# कांदा साठवणीचे तंत्र, तज्ज्ञांचा सल्ला

कांदा हा वर्षभर लागणारी फळभाजी आहे. महाराष्ट्रात रब्बी हंगामात उत्पादन कांद्याचे ६० टक्के घेतले जाते. त्यामुळे या हंगामातील काढलेला कांदा एप्रिलपासून साठवलेला असतो. संततधार पाऊस आणि जास्त आद्रता यांमुळे सध्या राज्यातील बऱ्याच भागांमध्ये साठवलेला कांदा खराब होतो आहे. त्यामुळे कांद्याच्या योग्य वाणाची निवड, अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन आणि योग्य प्रकारे साठवण केल्यास कांद्याची नासाडी टाळता येऊ शकते.



काढणीपूर्वीचे उपाय :कांद्याची चांगली टिकवणक्षमता मिळण्यासाठी उच्च गुणवत्तेच्या बिया म्हणजेच योग्य वाण वापरण्याची आवश्यकता असते. संतुलित प्रमाणात खते द्यावीत आणि विशेषतः पोटॅशचे प्रमाण जास्त ठेवावे, कारण यामुळे कांद्याची साठवणक्षमता वाढते. पाण्याचा वापर करताना अतिक्षारयुक्त पाणी देणे टाळावे, कारण त्याने कांदा लवकर खराब होतो. तसेच रासायनिक औषधांचा अतिरेक टाळून जैविक औषधांवर भर द्यावा. काढणी योग्य वेळी करावी, जेव्हा अर्ध्यापेक्षा जास्त पात वाळतात आणि पात्याची मान खाली झुकते तेव्हा काढणी उत्तम मानली जाते.

काढणीनंतरचे उपाय :काढणीनंतर कांद्याला ४–५ दिवस शेतातच सुकवावे आणि नंतर सावलीत १५ दिवस व्यवस्थित सुकवून साठवणुकीसाठी तयार करावे. मान कापताना ती २ सें.मी. वरून बारीक कापावी. साठवणीसाठी मोकळी, वाहती हवा असलेली जागा निवडावी आणि कांदा चाळ निर्जंतुक करून घ्यावी. खराब कांदे वेळीच वेगळे काढावेत कारण ते चांगल्या कांद्यांवर परिणाम करतात. कांदे चाळीत रचताना खालचे कांदे वर आणि वरचे कांदे खाली करुन भरावेत. या कांदा चाळीची उंची ४ फुटापेक्षा जास्त नसावी. प्रामुख्याने या चाळीमध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी.

कांदा चाळींसाठी अनुदान :कांदा साठवण्यासाठीच्या पारंपरिक कांदा चाळींसाठी राज्यशासन अनुदान देते. चार हजार रुपये प्रती मेट्रीक टन या प्रमाणाने राज्य सरकार कांदा चाळींसाठी शेतकऱ्यांना अनुदान देते. ह्या चाळीची रचना कांदा व लसूण संशोधन संस्थान आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दिलेल्या रचनेप्रमाणे करावी. केवळ याच रचनेसाठी राज्यसरकार अनुदान देते. त्यामुळे शेतकऱ्यांनी चाळीची बांधणी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनीच करावी.

आधुनिक पद्धती :कांदा साठवण्यासाठी पारंपरिक चाळींसोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरही फायदेशीर आहे. कंट्रोल्ड अ‍ॅट्मॉस्फेरिक ओनियन स्टोरेज म्हणजेच नियंत्रित तापमान कांदा साठवण पद्धतीत २७ तापमान आणि ६०–६५% आद्रता कायम ठेवली जाते, तसेच एअर सर्क्युलेशन सिस्टमद्वारे हवा खेळती ठेवली जाते. या तंत्रज्ञानामुळे कांद्याचे नुकसान अत्यल्प होते. त्याशिवाय शीतगृह सुद्धा एक चांगला पर्याय आहे. येथे ० तापमान आणि ६५–७०% आद्रता ठेवल्यास सहा महिन्यांनंतर फक्त ५% पर्यंतच नुकसान होते.नुकसान टाळण्यासाठी महत्त्वाचे सल्ले : योग्य वाण निवडणे (उदा. एन–२–४–१, भीमा किरण, भीमा शक्ती).

संतुलित खत व्यवस्थापन, विशेषतः नत्राचे प्रमाण नियंत्रित ठेवणे. योग्य वेळी काढणी आणि योग्य प्रकारे सुकवणे. खेळती हवा, नियंत्रित आर्द्रता आणि योग्य पॅकिंग (ज्यूट, जाळीदार पिशव्या) वापरणे. खराब कांदे वेळोवेळी वेगळे काढून चाळ स्वच्छ ठेवणे. योग्य वाणाची निवड, संतुलित खत व्यवस्थापन आणि जैविक औषधांचा वापर केल्यास कांद्याची टिकवणक्षमता वाढते. काढणीनंतर कांद्याला सावलीत १५ दिवस व्यवस्थित सुकवून साठवणुकीसाठी तयार करावे. पारंपरिक कांदा चाळी व आधुनिक नियंत्रित तापमान पद्धतीमुळे साठवणीदरम्यान नुकसान कमी होते. राज्य सरकारकडून कांदा चाळीसाठी प्रति मेट्रीक टन ४००० अनुदान उपलब्ध आहे. खराब कांदे वेळेवर वेगळे काढून चाळ स्वच्छ व हवेशीर ठेवणे गरजेचे आहे.

# उसाचे वाढे जनावरांना खायला दिल्यास काय परिणाम होतात

दैनंदिन पशू आहारात सतत वाढ्यांचा जास्त प्रमाणात समावेश झाल्याने जनावरांच्या पचनसंस्थेवर प्रतिकूल परिणाम होतो. यामुळे आरोग्य खालावते तसेच दूध उत्पादनात लक्षणीय घट होते. हे लक्षात घेऊन योग्य प्रमाणात जनावरांना उसाचे वाढे द्यावे. पश्चिम महाराष्ट्रात ऊस वाढे प्रामुख्याने जनावरांना हिरव्या चाऱ्याप्रमाणे दिले जातात, तर काही ठिकाणी त्यांना वाळवून कोरड्या चाऱ्याचा पर्याय म्हणूनही वापरले जाते. मात्र, सतत वाढ्यांचा जास्त प्रमाणात आहारात समावेश झाल्याने जनावरांच्या पचनसंस्थेवर प्रतिकूल परिणाम होत असून दूध उत्पादनात लक्षणीय घट होत आहे. यामुळे शेतकरी व पशुपालकांना मोठ्या आर्थिक तोट्याला सामोरे जावे लागत आहे. तज्ज्ञांच्या मते, ऊस वाढ्यांमध्ये प्रथिने आणि खनिजेही कमी प्रमाणात आढळतात. शिवाय त्यांची पाचक क्षमता मर्यादित असल्याने ते मुख्यत्वे तंतुमय चाऱ्याच्या स्वरूपातच उपयोगी ठरतात. तरीसुद्धा, दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी ऊस वाढे हा महत्त्वाचा आधार आहे.

ऊस वाढ्यांमध्ये आढळणारे घटक :

सेंद्रिय पदार्थ (जास्त प्रमाणात), प्रथिने (कमी प्रमाणात), तंतुमय घटक (जास्त प्रमाणात), चरबी, ऑक्सलेट्स (ऑक्सॅलिक आम्ल), कषाय द्रव्ये (टॅनिन्स), सिलिका, कॅल्शिअम : कमी, फॉस्फरस : अत्यल्प, पोटॅशिअम: तुलनेने जास्त, सोडियम : कमी प्रमाणात, मॅग्नेशिअम: अत्यल्प, गंधक : कमी प्रमाणात,

पचन प्रक्रियेवर परिणाम, लक्षणे व परिणाम :



पचण्यास योग्य घटकांचा अभाव. तंतुमय पदार्थांच्या रचनेमुळे पचन प्रक्रियेस अडथळा. आद्रतेचे जास्त असणार प्रमाण. अचानक आहारामध्ये उसाच्या वाढ्यांचा होणारा समावेश. पोषक–नाशक घटकांचा वाढ्यांमध्ये असणारा समावेश

अचानक खाद्यामध्ये वाढ्यांचा समावेश केल्याने पोटातील सूक्ष्मजीवांच्या समतोलात बिघाड होणे. ऊर्जा आणि नत्र यामधील समन्वयाचा अभाव. वाढे हे निकृष्ट दर्जाचे तंतुमय खाद्य असून त्यामध्ये प्रथिने व खनिजांचे प्रमाण अत्यल्प असते. भूक मंदावते, रवंथ बंद होणे किंवा मंदावते. पचन प्रक्रियेत गॅस जास्त प्रमाणात तयार होऊन डाव्या बाजूला पोट फुगल्यासारखे दिसते. कधी सैल पातळ शेण, तर कधी कोरडे, घट्ट शेण दिसते. पोट गच्च होणे, त्यामुळे रवंथ करण्याची प्रक्रिया मंदावते अथवा बंद होते. शरीरात पाण्याचे प्रमाण कमी होणे, थकवा जाणवणे, त्वचा कोरडी होणे आणि डोळे खोलगट जाणे. आतड्याची हालचाल कमी होऊन, शेण शरीराबाहेर टाकण्यास अडचण येते. जनावरांचे पोट दुखते, पोटावर लाथ मारते, वारंवार शेपटी हलवते, जमिनीवर बसण्याचा प्रयत्न करते. गंभीर परिस्थितीत निर्जलीकरण होते, वजन घटणे, तसेच चयापचय बिघाडामुळे जिवाला धोका निर्माण होतो. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन वासरे कोमात जातात. बेशुद्ध अवस्थेत मृत्यू होण्याचा धोका असतो. लघवीचे प्रमाण कमी होते.

उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाय : आहारात ऊस वाढ्यांचा समावेश त्वरित थांबवावा. गंभीर स्थितीमध्ये पशुवैद्यकांच्या देखरेखीखाली ग्लुकोज, नॉर्मल सलाईन किंवा आर.एल. सोल्यूशन देऊन निर्जलीकरण टाळावे. पोटात गॅस जास्त झाल्यास फुगलेपणा कमी करण्यासाठी आवश्यक औषधे फक्त पशुवैद्यकांच्या सल्ल्याने द्यावीत. खनिजे, जीवनसत्त्वांची पूर्तता करणे आवश्यक आहे, विशेषतः कॅल्शिअम, मॅग्नेशिअम व फॉस्फरसची पूर्तता करावी. रवंथ प्रक्रिया सुरळीत ठेवण्यासाठी रवंथ सुधारक औषधे पशुवैद्यकांच्या सल्ल्याने द्यावीत. आहारात अचानक बदल करण्याऐवजी हळूहळू बदल करावा. जनावरांना मुबलक प्रमाणात स्वच्छ पाणी द्यावे, जेणेकरून निर्जलीकरण होणार नाही. पचन सुलभ करण्यासाठी आहारात कडबा किंवा इतर तंतुमय चाऱ्याचा समावेश करावा. जनावरांच्या शेणाच्या स्वरूपावर लक्ष ठेवावे. शेण न झाल्यास त्वरित पशुवैद्यकांचा सल्ला घ्यावा. जनावरांना वाढे खाऊ घालण्यापूर्वी कमीत कमी ८ ते १० तास अगोदर वाढ्यावर चुन्याची १० टक्के निवळी फवारावी.




## जागतिक दिवस: जागतिक हृदय दिन

### महत्वाच्या घटना

१८२९ : लंडनच्या मेट्रोपॉलिटन पोलिसांची स्थापना झाली.
१८३६ : साली मद्रास चैंबर ऑफ कॉमर्स एंड इंडस्ट्रीची स्थापना करण्यात आली.
१८८५ : साली जगातील पहिला पब्लिक इलेक्ट्रिक ट्राम वे इंग्लंड मध्ये सुरु करण्यात आला.
१९१६ : जॉन डी. रॉकफेलर हा १ अब्ज डॉलर संपत्ती असलेला पहिला मनुष्य ठरला.
१९१७ : मुंबईतील दादर येथे इंडियन एज्युकेशन सोसायटीची पहिली शाळा 'किंग जॉर्ज हायस्कुल' सुरू झाली.
१९६२ : साली कलकत्ता शहरात एम एल दालमिया कंपनीतर्फे आशिया खंडातील पहिले तारांगण बिर्ला तारांगण सुरु करण्यात आलं.
१९६३ : 'बिर्ला तारांगण' हे आशियातील पहिले तारांगण कोलकाता येथे सुरू झाले.
१९४१ : दुसरे महायुद्ध किएव्हमधे नाझींनी ३३,७७१ ज्यूंना ठार मारले.
१९९१ : हैतीमधे लष्करी उठाव
२००१ : साली सयुक्त राष्ट्राने अमेरिकेचा आतंकवाद विरोधी प्रस्ताव पारित केला.
२००८ : 'लेहमन ब्रदर्स' आणि 'वॉशिंग्टन म्युच्युअल' या बड्या वित्तीय संस्थांनी दिवाळखोरी जाहीर केल्यामुळे न्यूयॉर्क स्टॉक एक्सचेंजचा 'डाऊ जोन्स' निर्देशांक एका दिवसात ७७८ ने कोसळला. ही अमेरिकन शेअरबाजारात एका दिवसात झालेली सर्वाधिक घट आहे.
२०१२ : अल्टमास कबीर यांनी भारताचे ३९ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
२०१४ : साली समलिंगी जोडप्यांचा पहिला विवाह इंग्लंड आणि वेल्समध्ये पार पडला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८६ : मेक्सिको देशाचे पहिले राष्ट्रपती ग्वाडालुपे व्हिक्टोरिया यांचा जन्म. (मृत्यू: २१ मार्च १८४३)
१८९० : ल. गो. तथा नानाशास्त्री दाते पंचांगकर्ते (मृत्यू:)
१८९९ : बॉलपोइंट पेनचे संशोधक लस्झो बियो यांचा जन्म. (मृत्यू: २४ ऑक्टोबर १९८५)
१९०१ : एनरिको फर्मी न्यूट्रॉन कणांवरील संशोधनासाठी
१९२५ : डॉ. शरदचंद्र गोखले समाजसेवक (मृत्यू: १५ जानेवारी २०१३)
१९२८ : ब्रजेश मिश्रा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (मृत्यू: २८ सप्टेंबर २०१२)
१९३२ : हमीद दलवाई मुस्लिम सत्यशोधक चळवळीचे अध्वर्यू (मृत्यू: ३ मे १९७७)
१९३२ : महमूद विनोदी अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माता (मृत्यू: २३ जुलै २००४)
१९३३ : मोजाम्बिक देशाचे पहिले राष्ट्रपती समोरा महेल यांचा जन्म. (मृत्यू: १९ ऑक्टोबर १९८६)
१९३४ : लान्स गिब्ज वेस्ट इंडीजचा फिरकी गोलंदाज
१९३६ : इटली देशाचे पंतप्रधान सिल्व्हियो बेर्लुस्कोनी यांचा जन्म.
१९३८ : नेदरलँड्स देशाचे पंतप्रधान विल्यम कॉक यांचा जन्म.
१९३८ : चे पदार्थविज्ञानातील नोबेल पारितोषिक विजेते इटालियन अमेरिकन–भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: २८ नोव्हेंबर १९५४)
१९४३ : लेक वॉलेसा नोबेल पारितोषिक विजेते पोलंडचे राष्ट्राध्यक्ष
१९४७ : साली भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश एस. एच. कपाडिया यांचा जन्मदिन.
१९५१ : चिली देशाच्या पहिल्या स्त्री राष्ट्राध्यक्ष मिशेल बाशेलेट यांचा जन्म.
१९५७ : ख्रिस ब्रॉड इंग्लिश क्रिकेटपटू व पंच
१९७८: मोहिनी भारद्वाज अमेरिकन कसरतपटू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

८५५ : लोथार (पहिला) रोमन सम्राट (जन्म: ७९५)
१५६० : स्वीडनचा राजा गुस्ताव (पहिला) यांचे निधन.
१८३३ : फर्डिनांड (सातवा) स्पेनचा राजा (जन्म: १४ आक्टोबर १७८४)
१९१३ : रुडॉल्फ डिझेल डिझेल इंजिनचा संशोधक (जन्म: १८ मार्च १८५८)
१९४२ : साली भारताच्या स्वातंत्र्या करिता आपल्या प्राणाची आहुती देणाऱ्या वीर भारतीय क्रांतिकारक महिला मातंगिनी हाजरा यांचे निधन.
१९८७ : अमेरिकन उद्योगपती हेन्री फोर्ड दुसरा यांचे निधन.
१९९१ : उस्ताद युनुस हुसेन खाँ आग्रा घराण्याच्या ११ व्या पिढीतील गायक (जन्म: १५ नोव्हेंबर १९२७)
२००४ : साली पद्मभूषण पुरस्कार व साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय मल्याळम भाषिक कवयित्री बालमणी अम्मा यांचे निधन.
२०१७ : साली अमेरिकन वंशीय भारतीय चित्रपट अभिनेते व दूरदर्शन कलाकार टॉम आल्टर यांचे निधन.

# दिपक बोऱ्हाडे यांची पालकमंत्री मुंडे व जलसंपदा मंत्री गिरीष महाजन यांनी घेतली भेट

जालन । प्रतिनिधी

धनगर समाजाला एसटीचे आरक्षणाची मागणीसाठी जालना येथे आमरण उपोषणास बसलेले दिपक बोऱ्हाडे यांनी आपले उपोषण मागे घ्यावे यासाठी व त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी सरकारचे शिष्टमंडळ म्हणुन पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री पंकजा मुंडे आणि जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीष महाजन यांनी भेट घेवून त्यांच्या प्रकृतीबाबत विचारणा करुन उपोषण मागे घेण्याबाबत विनंती केली.

यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर, बबनराव लोणीकर, नारायण कुचे, संतोष दानवे, हिकमत उढाण, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, भाजप नेते भास्कर आबा दानवे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा पोलिस अधीक्षक अजय कुमार बंसल यांची उपस्थिती होती. यावेळी पालकमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, मी याठिकाणी पालकमंत्री म्हणून आले आहे. दिपक बोऱ्हाडे यांची मागील तीन दिवसांपासून तब्येत खालावली असून, त्यांनी धनगर समाजासाठी केलेल्या मागण्यांविषयी आमच्या मनात संवेदना आहेत. धनगर समाज या मागण्यासाठी मागील अनेक



वर्षांपासून लढा देत आहे. त्यामुळे शासन देखील तुमच्या मागण्याबाबत सकारात्मक असून, तुमच्या न्यायासाठी लढणार आहे. परंतू हा प्रश्न चर्चेतून सोडता येईल याकरीता दिपक बोऱ्हाडे यांनी आपले उपोषण सोडून, आपले शिष्टमंडळ घेवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत चर्चा करण्यासाठी मुंबईला यावे असेही पालकमंत्री पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या.यावेळी जलसंपदा मंत्री गिरीष महाजन म्हणाले की, धनगर समाजाचा एसटी आरक्षणाचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. सद्या हा विषय सर्वोच्च न्यायालयात प्रलंबीत असून, हा प्रश्न सोडविण्यासाठी वेळोवेळी बैठका होत आहेत. यासाठी थोडा वेळ लागत आहे, ही वस्तुस्थिती आहे. आपण आरक्षणासाठी प्रामाणिक प्रयत्न करत आहात, यात शंका नाही. शासनाला देखील वाटते की हा प्रश्न आता सुटला पाहिजे परंतू काही कायद्याच्या अडचणी असल्याने याची आपणा सर्वांना कल्पना आहे. परंतू दिपक बोऱ्हाडे हे मागील ११ दिवसापासून उपोषण करत असून इतके दिवस उपोषण करणे योग्य नाही, त्याकरीता त्यांनी आपले उपोषण सोडावे. समाजाचा प्रश्न महत्वाचा असून हा प्रश्न सोडविण्यासाठी चर्चेची आवश्यता आहे. याकरीता बोऱ्हाडे यांनी चर्चेसाठी मुंबईला यावे आपण मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत बसून यावर चर्चा करु असे त्यांनी सांगितले. यावेळी बोऱ्हाडे यांच्याशी प्राथमिक चर्चा झाल्यानंतर मंत्री पंकजा मुंडे आणि गिरीष महाजन यांनी बोऱ्हाडे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून बोलणे करून दिले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी बोऱ्हाडे यांना शासन धनगर समाजाला आरक्षण देण्याकरीता सकारात्मक आहे. त्यासाठी प्रयत्न देखील करत आहे. परंतू एससी एसटी आरक्षण हे संवैधानिक आरक्षण असून हा केंद्राचा विषय आहे. शासनाने आरक्षणाबाबत आपली बाजू मांडली आहे. परंतू सर्वोच्च न्यायालयामुळेही यामध्ये काही अडचणी निर्माण झाल्याचे सांगून, धनगर समाजला एसटीतून आरक्षण देण्यासाठीची कायदेशीर प्रक्रिया सांगितली. तसेच हा प्रश्न सोडविण्यासाठी जो पर्यंत चर्चा होणार नाही, तोपर्यंत मार्ग् निघणार नाही. याकरीता श्री. बोऱ्हाडे यांनी आपले उपोषण सोडून चर्चा करण्यासाठी मुंबईला येण्याचे निमंत्रण दिले. उपोषणकर्ते बोऱ्हाडे आता का निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बनावट अपघाताचे नाटक करून ८८ लाखांची विदेशी दारू लंपास



परभणी। प्रतिनिधी

नाशिकहून नांदेडकडे 'अल्का वाईन शॉप'साठी जाणाऱ्या ट्रकचा बनावट अपघात घडवून ८८ लाख १७ हजार रुपयांचा विदेशी दारूसाठा लंपास केल्याप्रकरणी जिंतूर पोलिस आणि स्थानिक गुन्हे शाखेने मुख्य आरोपीसह तीन साथीदारांना अटक केली आहे. कारवाईत एकूण ६५.३९ लाख रुपये किमतीचा विदेशी दारूसाठा जप्त करण्यात आला आहे.

सिंड्राम कंपनी, नाशिक येथून विविध कंपन्यांची सुमारे १.३८ कोटी रुपये किमतीची दारू 'अल्का वाईन शॉप' नांदेडला पोहोचविण्यासाठी ट्रक क्रमांक एमएच १५ व्ही १७३५ ने पाठवला होता. ट्रक मार्गात असताना प्रभाकर विश्वनाथ घुगे व त्याचा मुलगा अनिल प्रभाकर घुगे यांनी बनावट अपघात घडवून दारू लंपास केली. त्यांनी ट्रक चिंचोली दराडे शिवारात उलथवून स्थानिकांनी चोरी केली असे दाखवून जिंतूर पोलीस ठाण्यात खोटी तक्रार केली. पोलिस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस अधीक्षक जिवन बेनिवाल यांच्या पथकाने तांत्रिक व गुप्त माहितीच्या आधारे घटनास्थळाची पाहणी करून ही फिर्याद खोटी असल्याचा निष्कर्ष काढला. त्यानंतर पुणे शिक्रापूर येथून प्रभाकर घुगे याला अटक करण्यात आली. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली आणि गुन्ह्यात सहभागी तीन साथीदारांची नावे उघड केली. त्यानुसार, अनिल शिवाजी चव्हाण (वय ३२), रविंद्र हरिभाऊ पवार (वय ३०), सचिन अशोक सोळंके (वय ३५) यांना मुद्देमालासह ताब्यात घेतले गेले. ही कारवाई पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ, सहाय्यक पोलीस अधीक्षक जिवन बेनिवाल, जिंतूर व स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त प्रयत्नातून करण्यात आली. तसेच जालना पोलीस निरीक्षक पंकज जाधव आणि त्यांच्या पथकाने देखील सहकार्य केले.

## ५१९ रिक्त पदांसाठी दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन –चिमणकर

जालना । प्रतिनिधी

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना अणि मातोश्री स्किल डेव्हलमेंट सेंटर, अंबड रोड, जालना यांचे संयुक्त विद्यामानाने दि.३० सप्टेंबर, २०२५ मंगळवार रोजी मातोश्री स्किल डेव्हलमेंट सेंटर, अंबड रोड, जालना येथे सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत'' पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा'' आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती कौशल्य विकास रोजगार उद्योजकता विभागाचे गणेश चिमणकर यांनी दिली आहे.


या मेळाव्यात दहावी बारावी/आय.टी.आय/बी.ए./बी.कॉम बी.एस सी./एम. कॉन / डिप्लोमा इंजीनिअर / बी. ई. इंजीनिअर इलेक्ट्रिकल/इलेक्ट्रिशियन डिप्लोमा व इत्यादी पात्रताधारक नोकरी इच्छूक महिला उमेदवारासाठी एकूण ५१९ रिक्तपदे उपलब्ध असून मुलाखतीसाठी विविध १० कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. या रोजगार मेळाव्यामध्ये मातोश्री स्किल डेव्हलपमेंट सेंटर प्रा.लि. जालना यांची ४ पदे, पेटीएम सेर्विसेस प्रा.लि. जालना यांची ५० पदे, आई इन्शुरन्स अँड इन्वेस्टमेंट सेर्विसेस यांची ४८ पदे. भारत फाइनेंशियल सेर्विसेस लिमिटेड जालना यांची ६६ पदे, टाटा मोटर्स लिमिटेड पुणे यांची १०० पदे, बजाज ऑटो लिमिटेड छत्रपती संभाजीनगर यांची १०० पदे, म्हस्के टेक्नोलॉजी प्रा. लि. बदनापूर जालना याची ६ पदे, धूत ट्रान्समिशन प्रा.लि. छ. संभाजीनगर यांची २० पदे, रेडिको खेतान लिमिटेड छत्रपती संभाजीनगर यांची २० पदे, युवशक्ती फाऊंडेशन छ. संभाजीनगर यांची १०५ पदे, अशी एकूण ५१९ रिक्तपदे उपलब्ध आहेत. या मेळाव्यासाठी वरील १० नामांकित कंपन्यांचे नियुक्ती अधिकारी प्रत्येक्ष उपस्थित राहणार असून पात्र उमेदवारांच्या चाचणी व मुलाखती घेऊन विविध पदांच्या रिक्त जागांसाठी निवड व भरती करणार आहेत. या सुवर्णसंधीचा जिल्हातील जास्तीत जास्त उमेदवारांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. किमान पाच प्रतीत रिझ्युमे/बायोडाटा, शैक्षणिक कागदपत्रे आणि आधार कार्ड/सेवायोजन नोंदणी छायाप्रतीसह सकाळी वाजता ९ उपस्थित राहावे, यासाठी काही अडचण आल्यास कार्यालयीन दुरध्वनी व व्हॉटस्अप क्रमांक-२९९०३३ वर संपर्क करावा असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, गणेश चिमणकर, यांनी केले आहे.

## हिंगोली जिल्ह्यात अतिवृष्टीचा कहर; कयाधू नदील पूर

हिंगोली। प्रतिनिधी

शुक्रवारी रात्री आणि शनिवारी झालेल्या पावसामुळे कयाधू नदीसह जिल्ह्यातील इतर लहान, मोठ्या ओढ्यांना महापूर आल्याने कळमनुरी तालुक्यातील अनेक गावांमध्ये पुराचे पाणी घुसले. हजारो हेक्टर क्षेत्रावरील पिके पाण्याखाली गेली. वसमत तालुक्यातील कुरुंदा गावात अतिवृष्टीमुळे पाणी घुसल्याने ग्रामस्थांचे प्रचंड नुकसान झाले.

जिल्ह्यात विविध ठिकाणी जोरदार पाऊस सुरु असून या पावसामुळे कयाधू नदीला पुर आला. पुराचे पाणी नदीकाठच्या शेतांमध्ये शिरले होते. या शिवाय नाल्यांच्या पुरामुळे शेती पिकांचे पुन्हा एकदा मोठे नुकसान झाले आहे. वसमत तालुक्यातील कुरुंदा गावातील आरामशीनच्या पाठीमागच्या वस्ती मध्ये काही घरांमध्ये पाणी शिरल्याने गावकऱ्यांची मोठी तारांबळ उडाल्याचे पहावयास मिळाले तर पांगरा शिंदे गावातून ओढ्याचे पाणी वाहू लागले असून



काही घरांच्या उंबरठ्याला पाणी लागल्याचे गावकरी सोपान शिंदे यांनी सांगितले. या शिवाय वापटी गावालगत असलेल्या ओढ्याचे पाणी पुलावरून वाहात असून त्यामुळे गावाचा संपर्क तुटला आहे. कळमनुरी तालुक्यातील कुपटी गावालगत असलेल्या तलावाच्या सांडव्यावरून पाणी वाहात असून तलावाच्या एका कोपऱ्यातील काही भाग वाहून गेल्याने तलावाचे पाणी परिसरातील शेतात शिरल्याचे माजी सरपंच जुबेर पठाण, नदीम पठाण यांनी सांगितले. तर हिंगोली ते समगा मार्गावरील लहान पुलावरून पाणी वाहात असल्याने समगा रस्ता बंद झाला आहे.

## जिल्हा कृषी अधीक्षक अधिकाऱ्यांनी २५ लाख खाल्ले – आ. बबनराव लोणीकर

जालना । प्रतिनिधी

जिल्हा कृषी अधीक्षक गहीनीनाथ कापसे येणे अतिवृष्टी अनुदान प्रकरणी कृषी विभागाचे कर्मचाऱ्यावर कारवाई नाही करण्यासाठी २५ लाख रुपये खाल्ल्याचा आरोप आमदार बबनराव लोणीकर यांनी केला आहे. जिल्हा कृषी अधीक्षक कापसे हे स्वतःला राज्यपाल राष्ट्रपती समजतात का असे सुद्धा आमदार लोणीकर म्हणाले.

जिल्ह्यामध्ये मुसळधार पावसामुळे तसेच ढगफुटीमुळे शेतकऱ्याचे शंभर टक्के नुकसान झाले असून, याची पाहणी करण्यासाठी पालकमंत्री, जिल्हाधिकारी, आमदार, खासदार, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, तालुका कृषी अधिकारी ही सर्व टीम चिखलातून शेतामध्ये जाऊन



पाहणी दौरा करीत आहेत. परंतु सदरील दौऱ्यामध्ये कृषी अधीक्षक कापसे यांनी तोंड दाखवले नाही. तुम्हाला लाज वाटते का, असे एका वायरल रेकॉर्डिंग मधून आमदार लोणीकर बोलताना दिसत आहेत. तसेच आमदार लोणीकर म्हणाले की, एकाही बैठकीला जिल्हा कृषी अधिकारी हजार नसतात. परतुर तालुक्यामध्ये सातोना मंडळांतर्गत १५० मिली पाऊस झाला होता परंतु सदरील गाव कृषी विभागाने वगळून टाकले. जिल्हा कृषी अधीक्षक हे शेतकऱ्याचे दुश्मन व शत्रू असल्यासारखे वागत आहेत. तुमच्यापेक्षा महिला अधिकारी बरे आहेत. फक्त हरामाची पगार खात आहे, थोडे तरी इमानदारीने शासनाचे काम करा. आठवड्याच्या सात दिवसांमध्ये फक्त एकच दिवस कार्यालयामध्ये येतात, तुमच्या जीवाला काही वाटले पाहिजे. कशाला नाटक करता, कोणाच्या जीवावर तुम्ही दादागिरी करता. तुम्ही असताल राजघराण्यातील ते चालणार नाही. दौरा पाहणी करायला तुमच्या पायाला चिखल लागतो का, का केस भिजातात. तुम्ही का कलेक्टर पेक्षा मोठे आहेत का असे सवाल आ. बबनराव लोणीकर यांनी विचारले आहेत.

## दिव्यांग संघटनेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

जालना। प्रतिनिधी

जालना शहरातील व तालुक्यातील दिव्यांगांना घरकुल आणि व्यवसाय करण्यासाठी दोनशे स्केअर फुट जागा या मागणीसाठी सकल दिव्यांग सामाजिक संघटना शिवसेना दिव्यांग आघाडीच्यावतीने आमरण उपोषणाला बसलेले आहेत. आता माघार नाहीत तर गुलाल उधळूनच मागे हटणार असा निर्धार सकल दिव्यांग सामाजिक संघटना शिवसेना दिव्यांग आघाडीने केला आहे.

आतापर्यंत एकाही दिव्यांगांना व्यवसाय करण्यासाठी जागा मिळाली नाही. महानगरपालिका दिव्यांगाच्या विरोधात आहे का असा प्रश्न सकल दिव्यांग सामाजिक संघटना शिवसेना दिव्यांग आघाडीने केला आहे. या उपोषणाला शिवसेना दिव्यांग आघाडीने जिल्हाध्यक्ष अनिल मगदूले, राहुल मुळे, सविता बोराडे, राजेश काविटी,



सुभाष सामने, शेक इस्माईल, रवी तायडे, रगनाथ शिंदे, अंकुश वाकचौरे, शेख रशीद, जगदीश सातपुते, रेणुका वाहुकर, अशपाक सय्यद, मिनाबाई काळबांडे आदि उपोषणाला बसलेले आहे. उपोषणाला विविध पक्षाचा संघटनेने पाठिंबा दिला आहे.

प्रहार अपंग क्रांती आंदोलन जिल्हा अध्यक्ष रवींद्र अंभोरे, भाजपचे नगरसेवक विजय पवार, वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दीपक डोके, हरीश रत्नपारखे, धर्मवीर छावा संघटनेचे लक्ष्मण गाडेकर आदींनी उपोषणाला पाठिंबा जाहीर केला आहे.

## लालबहादूर शास्त्री विद्यालयाचे घवघवीत यश

जालना । प्रतिनिधी

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद जालना यांच्या संयुक्त विद्यामानाने आयोजित तालुकास्तरीय खो खो स्पर्धा उत्साहात संपन्न. परतूर येथे लाल बहादूर शास्त्री विद्यालयाच्या मैदानावर या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा स्पर्धेचे उदघाटन पोलीस उपविभागीय अधिकारी रामेश्वर रेंगे यांच्या हस्ते करण्यात आले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक लव बिरादार, केंधली येथील मुख्यध्यापक पंडित निर्वळ, माजी क्रीडा संयोजक सरफराज कायम खाणी हे उपस्थित होते.

या स्पर्धेत तालुक्यातील मुलामुलींच्या एकूण ६० संघाने सहभाग नोंदवला होता. सायंकाळी सात वाजता या स्पर्धेचे अंतिम सामने खेळवण्यात आले. यामध्ये वयोगट १४ व १७ मुलामध्ये लालबहादूर शास्त्री विद्यालय प्रथम क्रमांक मिळवला तर वयोगट १४ मुलीमध्ये



लाल बहादूर शास्त्री कन्या विद्यालय तर वयोगट १७ मुलीमध्ये लाल बहादूर शास्त्री आष्टी यांनी प्रथम क्रमांक मिळवला. या स्पर्धेला पंच म्हणून बलजीत जुनी, जसबीर जुनी, उस्मान शेख, करण भेसर, करण सवणे, निखिल वाघमारे, वैभव काळे, अभिजित टाक, अमरसिंग जुनी, आशिष जाधव, ओंकार शहाणे, अनिकेत देशमुख, स्वराज सुरुंग, प्रकाश बादल, राहुल राठोड सादिक शेख यांनी काम पाहिले. तर क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी तालुका क्रीडा संयोजक प्रमोद राठोड, सारफराज कायमखाणी, पंडित निर्वळ आदींनी प्रयत्न केले. सूत्रसंचालन श्रीमती चंदा लड्डा यांनी केले तर आभार टी जी घुगे यांनी मानले. मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव कपिल आकात, कुणाल आकात, जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे व तालुका क्रीडा अधिकारी श्रीमती लता लोंढे यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले. यावेळी पोलीस उपविभागीय अधिकारी रामेश्वर रेंगे, मुख्याध्यापक लव बिरादार, मुख्याध्यापक पंडित निर्वळ आदी उपस्थित होते.

## चाकूर तालुक्यातील रस्ते पाण्याखाली, अनेक गावांचा संपर्क तुटला

लातूर। प्रतिनिधी

चाकूर तालुक्यात अतिवृष्टी सदृश्य पाऊस झाला. त्यामुळे नदी, नाले, तलाव तुडुंब भरून अनेक रस्ते पाण्याखाली गेले आहेत. अनेक गावांचा संपर्क तुटला असून जनजीवन विस्कळीत झाले. ९४. ८ मी.मी पाऊस झाला. चाकूर शहरात अनेक घरामध्ये पावसाचे पाणी शिरले असून मुख्याधिकारी लंबे यांच्या सूचनेने २० कुटुंबाचे स्थलांतर करण्यात आले. त्या कुटुंबाना नगरपंचायत येथील हॉलमध्ये निवासाची आणि भोजनाची व्यवस्था करण्यात आली.

तालुक्यातील अनेक गावांना पाण्याने वेढले आहे. त्यामुळे खेडे गावांतून येणाऱ्या नागरिकांचे हाल झाले. चाकूर ते आटोळा रस्त्यावरील रेल्वेपूल पाण्याखाली गेला असून त्या ठिकाणी असणाऱ्या शेतात पाणी शिरून शेतकऱ्याच्या सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले. शेळगांव येथील तिरू नदी ओसंडून वाहू लागली असून संगमवाडी आणि बोथी तलाव ओव्हरफ्लो झाला आहे. आजूबाजूच्या शेतात पाणी शिरले आहे. शिरनाळ, आनंदवाडी, नायगाव, नळेगाव, रोहिणा,जानवळ, चापोली आणि झरी या



भागातील शेतात पाणी शिरून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.खेडेगावातून तालुक्यात येणाऱ्या दूधाला पावसाचा फटका बसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. तालुक्यात अनेक भागात ढगफुटी सदृश परिस्थिती निर्माण झाली असून नळेगावहून हुकाचीवाडी आणि हटकरवाडी जाणारा संपूर्ण रस्ता पाण्याखाली गेल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली आहे. तालुक्यातील खरीपाच्या पिकात मोठ्या प्रमाणात पाणी शिरल्याने सोयाबीन पिकांचे नुकसान झाले आहे. तोंडचा घास हातातून गेल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली असून शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.

# मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी विशेष मदत पॅकेज द्या

## खा.बजरंग सोनवणे यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र

बीड। प्रतिनिधी

मागील पंधरा दिवसांपासून बीड जिल्हा व संपूर्ण मराठवाडा विभागात अतिवृष्टी होत आहे.अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे नुकसान झाले असून या आर्थिक संकटातून सावरण्यासाठी पुरग्रस्तांसाठी विशेष मदत पॅकेज देण्यात यावे, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

बीड जिल्ह्यात आणि संपूर्ण मराठवाड्यात अतिवृष्टी होत आहे. अतिवृष्टीमुळे नद्यांना महापूर आलेला असून शेतकऱ्यांच्या शेतीचे, पिकाचे आणि जनावरांसह घरांचेही मोठे नुकसान झालेले आहे. खा.बजरंग सोनवणे हे मागील अनेक दिवसांपासून स्वतः बांधावर जावून अतिवृष्टीग्रस्तांच्या भेटी घेवून अश्रू पुसायचे काम करत आहेत, खचलेल्या शेतकऱ्यांना धीर देण्याचे काम करत असून दि.२५ सप्टेंबर रोजी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विशेष पॅकेजच्या संदर्भात पत्र दिले असून पत्रात म्हटले आहे, महाराष्ट्र राज्यातील बीड लोकसभा मतदारसंघ तसेच संपूर्ण मराठवाडा विभाग मागील एका महिन्यापासून सतत होणाऱ्या अतिवृष्टी व ढगफुटीच्या नैसर्गिक आपत्तीमुळे अतिशय गंभीर संकटाला सामोरे जात आहे. या भीषण आपत्तीने शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांचे जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. सुपीक शेत-जमीन वाहून गेली असून उभे असलेले खरीप पीक संपूर्णपणे नष्ट झाले आहे. मोठ्या प्रमाणावर जनावरे दगावल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था ठप्प झाली आहे. अनेक शेतकरी व ग्रामस्थांना प्राण गमवावे लागले आहेत. हजारो कुटुंबे घर कोसळल्यामुळे बेघर झाली असून रस्ते, पूल व इतर सार्वजनिक सुविधा प्रचंड प्रमाणावर उद्ध्वस्त झाल्या आहेत.ही केवळ नैसर्गिक आपत्ती नसून एक मोठी मानवी शोकांतिका आहे. देशाला अन्नधान्य पुरवणारा शेतकरी आज खोल नैराश्यात व संकटात आहे. या अत्यंत गंभीर परिस्थितीत केंद्र शासनाने तात्काळ उपाययोजना कराव्यात, आज बीड व मराठवाड्यातील जनता त्याच आशेने व आपेक्षेने आपल्याकडे पाहत आहेत. विशेष मदत पॅकेजची तातडीने मंजुरी मिळाल्यास केवळ या



**या आहेत मागण्या :** बीड जिल्हा व संपूर्ण मराठवाडा विभागासाठी विशेष मदत पॅकेज जाहीर करावे. पंतप्रधान राष्ट्रीय राहत कोषामधून तातडीची आर्थिक मदत द्यावी. पीकहानी भरपाई, कर्जमाफी व पुनर्लागवडीसाठी आर्थिक मदत द्यावी. पुरामुळे मृत्यू पावलेल्या शेतकरी व ग्रामस्थांच्या कुटुंबीयांना योग्य ती अनुदान रक्कम द्यावी. कोसळलेल्या घरांच्या पुनर्बांधणीसाठी व उद्ध्वस्त झालेल्या सार्वजनिक सुविधांच्या दुरुस्तीसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून द्यावा.

आपत्तीग्रस्तांना दिलासा मिळणार नाही तर शेतकरी वर्गाच्या आत्मविश्वासालाही नवी उभारी मिळेल, असे म्हटले आहे.

## नशेची औषधे विकण्यास विरोध करणाऱ्या व्यावसायिकाला मारहाण

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

नशेच्या गोळ्या व औषधाच्या बाटल्या विकण्यास विरोध केल्याने चार जणांनी एका भंगार व्यावसायिकाला बेदम मारहाण केली. या माहरणीत हा व्यावसायिक गंभीर जखमी झाला आहे. ही घटना शुक्रवारी नेहरूनगर कटकट गेट येथे घडली.

फरान खान निजाम खान (२१, रा. हर्मूल), नवास खान नवाब खान शेख (२४), नाजीम नवाब शेख (२२) व सोनु शहा (२०, रा. सर्व रा. नेहरूनगर) अशी मारहाण करणाऱ्यांची नावे असून त्यांच्याविर-ोधात जिन्सी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सलमान खान अमीर खान (२९, रा. नेहरूनगर कटकगेट) यांनी परिसरात बटन गोळ्या व नशेसाठी वापरण्यात येत असलेले विविध औषधाच्या बाटल्या विकण्यास वरील चौघांना विरोध केला होता. यामुळें संतप्त झालेल्या चौघांनी आम्हाला बदनाम करतो का म्हणत बेदम मारहाण केली. ते एवढ्यावरच थांबले नाही तर नाजीमने सलमान यांचे हात पकडले, तर फरान खानने लोखंडी रॉडने वार केला. यात सलमान गंभीर जखमी झाले आहेत. यापुढे जर नशेच्या गोळ्या विकण्यास विरोध केला तर जिवे मारण्याची धमकी दिली. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. जिन्सी पोलिसांनी सलमान खान यांच्या तक्रारीवरून फरान खान, नवास खान, नाजीम नवाब शेख, सोनु शहा या चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास हवालदार डकले करीत आहेत.

# बीड शहरात क्षीरसागर दाम्पत्याकडून मदतकार्य जोरात

## तहसील व नगरपालिकेच्या मदतीने पंचनामे सुरु; तुंबलेल्या पाण्याचा रस्ता मोकळा

बीड । प्रतिनिधी

दिवसभर झालेल्या संततधार पावसामुळे बीड शहरात शनिवारी (दि.२७) सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. शहरातील नाळवंडी नाका, गांधी नगर, आदित्य कॉलेज परिसर, लोणार पुरा, जुना दगडी पूल आदी भागात पाणी साचून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी विविध भागांची पाहणी करून नागरिकांच्या भेटी घेतल्या व त्यांना धीर दिला. त्यांच्या सूचनेनंतर तहसील व नगरपरिषद प्रशासनाने गतीने मदतकार्य पोहोचविले. तसेच,



घरांच्या नुकसानीचे पंचनामे सुरू करण्यात आले आहेत.

बीड शहरातील गांधीनगर भागातील अनेक घरात पाणी शिरले. त्याठिकाणी जाऊन डॉ.सारिका क्षीरसागर यांनी नागरिकांची भेट घेतली. त्यांच्या सूचनेवरून तहसील व नगरपरिषद प्रशासनाने तेथील नागरिकांना आदित्य कॉलेज परिसरात सुरक्षितस्थळी स्थलांतरित केले. या नागरिकांच्या निवासासह जेवणाची सोय करण्यात आली त्यांना धनी दिले जाणार आहे. ही कार्यवाही नायब तहसीलदार सुहास हजारे यांच्या उपस्थितीत मंडळ अधिकारी अनिल तांदळे यांनी केली असून त्या भागातील ३३ घरांच्या नुकसानीचे पंचनामे केले आहेत.

### नागरिकांसाठी हेल्पलाइन जारी

आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत मिळावी यासाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या संपर्क कार्यालयातून हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे. ग्रामीण भागासाठी ९६२३८७७५९९ व ७३५०५१०००९ आणि शहरी भागासाठी ९४२२६१६६६२, ८०८७५०८२६७, ८९९९९२९२८० या हेल्पलाइन नंबरवर किंवा जिल्हा प्रशासनाच्या आपत्कालीन क्रमांक ०२४४२-२९९२९९ यावर संपर्क करावा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

### जालना रोडलगतच्या नालीची समस्या ना.अजित पवार यांच्याकडे मांडणार

बीड शहरातील जालना रोड भागातील सर्व दुकानांमध्ये पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तत्काळ घटनास्थळी जाऊन मुख्याधिकाऱ्यांशी संपर्क साधून आवश्यक उपाययोजना करण्यास सांगितले. याठिकाणी वारंवार पाणी साचत असल्याने कायमस्वरूपी तोडगा निघावा यासाठी पालकमंत्री ना.अजित पवार यांना कळविण्यात येणार आहे.

### वीजपुरवठा सुरळीत करण्याचे काम सुरू

पांगरी रोड भागातील विद्युत खांब व तारा वाकल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता. डॉ.सारिका क्षीरसागर यांनी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना तातडीने काम सुरू करण्याच्या सूचना दिल्या असून, वीजपुरवठा सुरळीत करण्याचे काम सुरू झाले.

# तलवाडा पोलिसांची अंबिका नगर येथील तीन वेगवेगळ्या ठिकाणी हातभट्टी दारू अड्ड्यावर कारवाई

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील अंबिकानगर येथे अवैध्यरित्या हातभट्टी दारू विक्री व तयार होत असल्याची माहिती तलवाडा पोलिसांना मिळाल्यानंतर आज दि.२७/९/२०२५ रोजी सकाळी शनिवारी तलवाडा येथील अंबिका नगर येथे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी आनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनि मनोज निलंगेकर, यांच्या सह पोह शेख मोहसीन,पोह हनुमान जावळे, पोह नारायण काकडे, गोपनीय शाखेचे विठ्ठल राठोड,पोह कैस्व गोरे, महिला कॉन्स्टेबल प्रियंका



यादव, यांनी अंबिका नगर येथे तीन वेगवेगळ्या ठिकाणी अवैधरीत्या हातभट्टी अड्ड्यावर कारवाई केली आहे.सविस्तर अंबिका नगर भागातील हातभट्टी अड्ड्यावर छापा मारला. असता एका प्लॅस्टिक ड्रम मध्ये हातभट्टीची तयार दारू १९३ लिटर २१५० लिटर रसायन नष्ट करण्यात आला एकुण मुद्दे माल ९४५५० रूपयांचा मुद्दे माल नष्ट करण्यात आला आहे. पोलीस कॉन्स्टेबल विठ्ठल राठोड यांच्या फिर्यादीवरून आरोपी माशाबाई कालिदास काळे, विठ्ठल तुकाराम काळे, तानाबाई पाराजी चव्हाण, यांच्या विरोधात कलम ६५ (ई) (फ) म. महाराष्ट्र दारू बंदी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास तलवाडा पोलीस करीत आहेत.



बीड शहरातील लक्ष्मण नगर फुलेनगर चंपावती नगर मधील शिवाजी नवरात्र महोत्सव देवीची पूजा अर्ज करताना या प्रभागाचे भाग्यविधाते लोकप्रिय माजी नगरपालिका सभापती नवनाथांना शिराळे पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आली यावेळी महेश जाधव दीपक जाधव लाला वाघमारे कृष्णा शेरकर महेंद्र वाघमारे शशिकांत जावळे इत्यादी महिला भगिनीसह भाविक भक्त उपस्थित होते


# तेलगाव महसूल मंडळात ओला दुष्काळ जाहीर करा

### पहाडी पारगाव येथील शेतकऱ्यांची मागणी

वडवणी । प्रतिनिधी

धारूर तालुक्यामध्ये मागील पंधरा दिवसापासून विजांच्या कडकडाटासह अतिमुसळधार पाऊस सुरू आहे त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून तेलगाव महसूल मंडळात ओला दुष्काळ जाहीर करावा व शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी अशी मागणी पहाडी पारगाव येथील शेतकरी करत आहेत.

धारूर तालुक्यातील सर्वच महसूल मंडळामध्ये अतिवृष्टी झालेली असून त्यापैकी तेलगाव महसूल मंडळात सर्वाधिक ८५ मिलिमीटर पाऊस झाल्याची नोंद झाली आहे .पहाडी पारगाव येथील शेतकऱ्याचे कापूस,सोयाबीन, तूर ही पिके अतिवृष्टीमुळे पाण्याखाली गेली आहेत कपाशीच्या झाडाचे बोंडे ही काळी पडली आहेत,पाने लाल झाली आहेत बोंड आळी होण्याची संभावना आहे तसेच सोयाबीन काळी पडली असून तिला कोंब आली आहेत शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे शेतकरी बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे त्यामुळे सर्रासपणे



तेलगाव महसूल मंडळात ओला दुष्काळ जाहीर करून पन्नास हजार रुपये हेक्टरी मदत जाहीर करावी अशी शेतकरी मागणी करत आहेत.

# पिंपळवंडी-अंमळनेर परिसरात शनिवारी रात्रभर जोराचा पाऊस ;पिके पाण्यात,घरांची पडझड

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी-अंमळनेर-कोतन तसेच खोपटी-पांगरी-भडकेल परिसरात दि.२७/०९/२०२५ शनिवार रोजी रात्रभर झालेल्या पावसाने अक्षरशा झोडपून काढल्याने ग्रामस्थ व शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले असून या पावसाने पुन्हा परिसरातील नदी-नाल्यांना महापूर येऊन दुथडी भरून वाहू लागले आहेत.शनिवारी दिवसभर या




परिसरात सूर्य दर्शन झालेच नाही.या पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतात उभे असलेल्या सोयाबीन,तूर,कांदा पिकांची पूर्ती वाट लागली असून काढलेल्या सोयाबीनच्या शेंगांना कोंब फुटू लागल्याने पावसाच्या पाण्याने शेताचे तळे झाले असून शेतकऱ्यांना या शेताकडे पाहून शेताचे झाले तळे, आता पीक शोधू कुठे अशी म्हणण्याची वेळ आली आहे.तसेच शनिवारी रात्री झालेल्या पावसामुळे पिंपळवंडी या ठिकाणच्या अनेकांची पत्र्याची व माळवदाची घरे गळू लागली असून घरे,घराच्या भिंती पडून मोठे नुकसान ◀◀ पान २ वर

# जात-धर्म विसरून शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी एकजुटीने लढा-मंत्री बच्चू कडू

किल्ले धारूर । प्रतिनिधी

शेतकरी व शेतमजुरांच्या हक्कांसाठी हमीभाव व कर्जमाफी देणे ही काळाची गरज आहे. जातीपाती, धर्मपंथ वा रंग वेगळे असले तरी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सर्वांनी एकजुटीने लढा दिला पाहिजे, असे प्रतिपादन प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते व माजी मंत्री बच्चूभाऊ कडू यांनी केले.

बच्चूभाऊ कडू म्हणाले, ''पंजाब सरकार शेतकऱ्यांना दिलासा देत आहे. मग आपल्या राज्याचे बजेट कितीतरी पट जास्त असताना हे सरकार शेतकऱ्यांना मदत का करू शकत नाही? मुख्यमंत्री उडवाउडवीची उत्तरे देतात. खाजगी उद्योजकांचे कोट्यवधी रुपयांचे कर्ज माफ करता येते, मग शेतकऱ्यांसाठी का




नाही? जात-धर्म विसरून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर एकत्र या. शेतकऱ्यांचे आंदोलन हेच खरी ताकद आहे.''

ते पुढे म्हणाले, ''पैसा येतो आणि जातो, पण तो कुठे जातो यावर सर्वसामान्यांनी लक्ष ठेवले पाहिजे. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून हमीभाव देणे आवश्यक आहे. गेल्या वीस वर्षांपासून सभागृहात शेतकरी व दिव्यांगांच्या प्रश्नांवर आवाज उठवला, पण अजूनही शेतकऱ्यांच्या जीवनात सुखाचा दिवस आलेला नाही. यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. या प्रसंगी प्रहारचे जिल्हाध्यक्ष रघुनाथ तोडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर सूत्रसंचालन विश्वास शिनगारे यांनी केले यावेळी बल्लु भाऊ जवंजाळ, गजानन लोखंडकर, प्रमुख उपस्थिती अशोक तोंडे रावसाहेब तोंडे बळीराम तोंडे महारुद्र तोंडे चींतामण तोंडे विलास रुद्रवार,बालासाहेब चव्हाण, हनुमंत तोडे सह शेतकरी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# धारूर तालुक्यातील जनजीवन तिसऱ्याही दिवशी विस्कळीत, चार मार्गावरील वाहतूक दुपारपर्यंत बंदच



किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यात गेल्या तीन दिवसा पासून अतिवृष्टीच्या पावसाने ग्रामीण भागातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून चार दिवसा पासून विविध मार्गावरील वाहतूक बंद असल्याने २० ते २२ गावांचा तालुक्याचा संपर्क तिसऱ्या ही दिवशी दुपारपर्यंत तुटलेलाच होता

धारूर तालुक्यात गेल्या तीन दिवसापासून अतिवृष्टीच्या पावसाने हजरी लावली असून धारूर मंडळात सतत तिसऱ्या दिवशी अतिवृष्टी झाली धारूर तालुक्यात पावसाची सरासरी ६६९. ८ मीमी आहे मात्र आत्तापर्यंत १११७.६ मी मी पावसाची नोंद झाली असून काल धारूर मंडळात ६८.८ मीमी अतिवृष्टी पावसाची नोंद झाली आहे या पावसाने आडस, आसरडोह, चारदरी, तांदळवाडी, चिंचपूर, सोनीमोहा या रस्त्यावरील वाहतूक तीन दिवसापासून बंद आहे रविवारी ही दुपारपर्यंत या रस्त्यावरील वाहतूक बंदच होती यामुळे तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले असून तालुक्याचा संपर्क २० ते २२ गावाचा तुटला होता रविवारी दुपारनंतर पाणी ओसरल्याने काही नद्या वरील वाहतूक मात्र सुरू झाली होती मात्र वाहतूक करताना जीव मुठीत ही वाहतूक करण्याची पाळी येत होती या पावसाने शेतीचेही मोठे नुकसान झाले असून सर्वच पिके शेतकऱ्यांच्या हातची गेली आहेत यामुळे शेतकरी मात्र हतबल झाला आहे.

# मच्छिमार भोई कुटुंबांना ५० हजार रूपये नुकसानभरपाई द्यावी -परसे

माजलगाव । प्रतिनिधी

मराठवाड्यात ढगफुटी सारख्या पावसाने थैमान घातलं असून, गोदावरी सिंधफणा वा अन्य छोट्या मोठ्या नद्यांनी पात्र सोडून एक ते दीड किलोमीटर पाण्याने वळण घेऊन जनजीवन विस्कळीत झाले असून, बीड जिल्ह्यातील मच्छिमार भोई समाजाची जाळे,होडी जीवनावश्यक वस्तूंचे प्रचंड नुकसान झाले आहे.

मराठवाड्यातील सर्व नद्यांवर छोट्या मोठ्या तळ्यावर पूर परिस्थिती झालेली आहे त्या गरीब स्थानिक मच्छीमारांचे जाळे,होडी,बोटी संसारोपयोगी वस्तू ,धान्यसह लाखो रुपयाची साहित्य वाहून गेलेले आहेत,मच्छिमार कुटुंबाला ५० हजार रुपये नुकसानभरपाई देण्यात यावी,अशी मागणी बीड जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दि.२७ सप्टेंबर रोजी पुरपरिस्थितीबाबतच्या दौऱ्यादरम्यान मौजे मंजरथ येथे सामाजिक कार्यकर्ते वसंत परसे व राजेंद्र काका आनंदगांवकर यांनी केली आहे,ग्रामपंचायत मंजरथ येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी श्रीमती मुळुक, विस्तार अधिकारी (पं). महेंद्र गायकवाड, ◀◀ पान २ वर

# देविदास धस यांच्या प्रेरणेतून साईनाथ पतसंस्थेची वाटचाल -विठ्ठल शेंबडे

आष्टी । प्रतिनिधी

ज्येष्ठ नेते माजी जि प सदस्य देविदास आबा धस यांच्या प्रेरणेतून या साईनाथ सहकारी वीज कर्मचारी पतसंस्थेची यशस्वी वाटचाल सुरू असून आज वार्षिक सभा तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाल्याने सर्व सदस्यांची ऑनलाइन मीटिंग घेऊन पार पडली अशी माहिती पतसंस्थेचे चेअरमन विठ्ठल शेंबडे यांनी दिली साईनाथ विज सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित कडा या पतसंस्थेचे विठ्ठल विश्वनाथ शेंबडे चेअरमन रमेश गोविंद बनसोडे व्हाइस चेअरमन ,शाकीर



इब्राहिम शेख संचालक व मानद सचिव ,अमृत संभाजी आजबे तज्ञ संचालक, महेश महादेव घोडके, संचालक अमोल भीमराव कर्डिले ,संचालक अशोक रावसाहेब काकडे ,बापूराव नवनाथ क-हे आश्विन मनोहर मंडळे श्रीमती निर्मला अर्जुन गळघटे, श्रीमती उषा भाऊसाहेब जगदाळे, श्री सय्यद बाशीद अहमद, हे आहेत, विद्यमान आमदार लोकनेते सुरेश आण्णा धस माजी आमदार भीमरावजी धोंडे साहेब माजी आमदार साहेबराव दरेकर नाना, बाळासाहेब आजबे काका,

◀◀ पान २ वर

# मराठवाड्याला इंडियन मेडिकल असोसिएशन पुरविणार वैद्यकीय मदत

## पूरग्रस्तांना सर्वोतोपरी वैद्यकीय सेवा, मानसिक आरोग्य सेवा व मदत पुरविणार - डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मराठवाड्यामध्ये सर्वत्र वादळी पावसाने हाहाकार माजविला आहे. पडत असलेल्या प्रचंड पावसामुळे सर्वत्र पूर सदृश्य परिस्थिती आलेली आहे. जनजीवन विस्कळीत झालेले आहे. या पडत असलेल्या संततधार पावसामुळे आणि बदललेल्या वातावरणामुळे इथून पुढे विविध संसर्गजन्य रोग व रोगराई पसरण्याचा धोका आहे. या रोगराई सदृश्य परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी आणि पूरग्रस्त भागातील नागरिकांना आरोग्याची सुरक्षितता लाभावी यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन या पूरग्रस्त भागातील नागरिकांना आरोग्यसेवा पुरविण्यास कटिबद्ध आहे. पूरग्रस्त भागातील नागरिकांना आरोग्य विषयक काहीही मार्गदर्शन किंवा गरज भासली तर



स्थानिक इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्ष, सचिव व इतर पदाधिकाऱ्यांशी तात्काळ संपर्क साधावा. ते तुम्हाला वैद्यकीय सेवा पुरवतील अशी ग्वाही इंडियन मेडिकल असोसिएशनचे राज्य पदाधिकारी सांस्कृतिक समिति अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

त्यासाठी ज्यांना वैद्यकीय सेवेची आवश्यकता आहे अशा रूग्णांनी किंवा नातेवाईकांनी ९४०३७७५५५५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून आपले नांव, होत असलेला त्रास, आपले गाव, तालुका व जिल्हा या क्रमांकावर व्हाट्सअप करावा. संपर्क साधलेल्या सर्वांना लागलीच त्यांच्या जवळील कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या इंडियन मेडिकल असोसिएशनच्या संलग्न पदाधिकाऱ्यांची संपर्क करून दिला जाईल व त्यांना ते आहेत तेथेच वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली जाईल असे डॉ.इंगोले यांनी यावेळी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. इंडियन मेडिकल असोसिएशन ही सर्वसामान्य जनतेच्या आरोग्य हिताशी कटिबद्ध आहे. सर्वसामान्य जनतेचे आरोग्य सुरक्षा इंडियन मेडिकल असोसिएशनचे प्राधान्यक्रम आहे. निसर्गनिर्मित या संकटामध्ये सर्वसामान्य जनतेच्या सोबत इंडियन मेडिकल ◀◀ पान २ वर

# नियोजन नसल्याने बीड शहरात रस्त्यावर आणि घरात पाणी



बीड । प्रतिनिधी

बीड शहरात यावर्षी पावसाळ्याने अनेक रस्ते बंद केले आहेत. त्याचप्रमाणे शहरातील अनेक भागातील गल्ली बोळातील घरामध्ये पाणी शिरले आहे. नियोजनाचा अभाव यातून प्रामुख्याने दिसून येत आहे. नदी आणि नाल्यांचे पात्र लहान करणे, नियमाप्रमाणे रस्ते न सोडणे, अशा गैरप्रकारांना सत्ताधाऱ्यांनी खत पाणी घालणे, केवळ याचा परिणाम जनतेला भोगावा ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
सोमवार, दि.२९ सप्टेंबर २०२५ । पान ७

# पीएमआरडीएचा विकास आराखडा अखेर रद्द; 'त्या' २३ गावांचा डीपी तयार करण्याची जबाबदारी पुणे महापालिकेकडे




**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) वादग्रस्त ठरलेला प्रारूप विकास आराखडा (डीपी) अखेर राज्य सरकारने रद्द केला आहे. शनिवारी (दि. २७) यासंबंधीची अधिकृत अधिसूचना जाहीर करण्यात आली. त्यामुळे पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांचा विकास आराखडा तयार करण्याची जबाबदारी पुणे महापालिकेकडे दिली जाणार का? याकडे आता साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

आराखड्याच्या तयार करण्यात पीएमआरडीएने सिंगापूरमधील एका कंपनीला सुमारे ४० कोटी रुपये दिले होते. मात्र, हा आराखडा रद्द झाल्याने हा खर्च वाया गेला आहे. २०१५ साली पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांसह सात नगरपरिषदा आणि ८४२ गावांचा समावेश करून नियोजनबद्ध विकासासाठी पीएमआरडीएची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर पीएमआरडीएला नियोजन प्राधिकरण म्हणून मान्यता देत विकास आराखडा तयार करण्याचे अधिकार देण्यात आले. पीएमआरडीएने २०२१ मध्ये प्रारूप विकास आराखडा जाहीर केला होता. या आराखड्यावर तब्बल ६७ हजार हरकती व सूचना प्राप्त झाल्या. त्याच दरम्यान, २३ गावे पुणे महापालिकेत समाविष्ट करण्यात आली. त्यामुळे या गावांसाठी विकास आराखडा तयार करण्याचा अधिकार पीएमआरडीएकडे नसून, पुणे महापालिकेकडे आहे, असा दावा भाजपने केला होता. मात्र, त्या वेळी राज्यात महाविकास आघाडी सरकार सत्तेवर असल्याने भाजपची ही मागणी फेटाळण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर काही संस्थांनी पीएमआरडीएच्या अधिकाराविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालयाने मार्च २०२३ मध्ये या प्रकरणावर अंतरिम स्थगिती दिली होती. शेवटी, मुख्यमंत्री तथा पीएमआरडीए अध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार राज्य सरकारने हा डीपी रद्द करण्याचा निर्णय घेतला असून त्याची अधिसूचना शनिवारी काढण्यात आली. पीएमआरडीएने आराखडा रद्द करण्याची प्रक्रिया सुरू केल्यानंतर, पुणे महापालिकेने समाविष्ट २३ गावांसाठी स्वतंत्र विकास आराखडा तयार करण्याची तयारी दर्शवली आहे. यासाठी महापालिकेने सुमारे एक महिन्यापूर्वी राज्य शासनाला पत्र पाठवून, २३ गावांचा आराखडा तयार करण्यासाठी पुणे महापालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून मान्यता द्यावी, अशी मागणी केली आहे. मात्र, अद्याप शासनाकडून या मागणीवर कोणताही निर्णय झालेला नाही. आता याबाबत काय निर्णय होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# मुळशी तालुक्यातील अंबडबेटमधील कंपनीला आग; तीन जण होरपळले, रुग्णालयात उपचार सुरु



**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात अंबडबेट येथील एका रासायनिक कंपनीत रविवारी दुपारी भीषण आग लागल्याची घटना घडली. दुपारी साधारण १२.१५ च्या सुमारास लागलेल्या आगीसोबत स्फोट झाल्याची

प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे. या कंपनीत सोडियम क्लोराइडचे पॅकेजिंग केले जात असल्याचे समजते.आगीची माहिती मिळताच मारुंजी अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. तसेच पौड पोलिसही तातडीने घटनास्थळी दाखल होऊन परिसर सील करून बचावकार्याला सुरुवात केली. आगीमुळे मोठ्या प्रमाणात धुराचे लोट परिसरात पसरले होते. स्थानिक नागरिकांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अग्निशमन दलाकडून आग विझवण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू असून, स्फोटामुळे कंपनीच्या परिसरात मोठे नुकसान झाले आहे.या दुर्घटनेत दोन पुरुष आणि एका महिलेचा समावेश असलेल्या तिघा कामगारांना गंभीर दुखापत झाली आहे. जखमींमध्ये संदीप लक्ष्मण शेंडकर (४९, जळीत सुमारे ६० टक्के), मोहित राज सुखन चौधरी (४९, जळीत सुमारे ६० टक्के) आणि महिला रेणुका धनराज गायकवाड (४०, जळीत अंदाजे १० टक्के) यांचा समावेश आहे. तिघांनाही तातडीने घोटावडे फाटा येथील रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार सुरू आहेत. घटनेचं नेमकं कारण अजून स्पष्ट झालेलं नाही. रासायनिक स्फोटामुळे आग लागली असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली असून अधिक तपास पौड पोलिस करीत आहेत. यासंदर्भात कंपनीतील इतर कर्मचारी आणि प्रत्यक्षदर्शींचेही जबाब घेतले जात आहेत.

# आंदेकर टोळीवर पोलिसांची कारवाई ; १७.९८ कोटींची मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया सुरू

**पुणे । प्रतिनिधी**

मोक्का कायद्याअंतर्गत आंदेकर टोळीच्या तब्बल १७ कोटी ९८ लाख रुपयांच्या मालमत्तेची जप्ती प्रक्रिया सुरू आहे. आयुष कोमकर खूनप्रकरणी पोलिसांनी टोळीवर मोठा घाव घातला आहे. टोळीप्रमुख सूर्यकांत ऊर्फ बंडू आंदेकरसह १६ जणांना अटक झाली असून, त्यात तीन महिलांचा समावेश आहे.आयुष कोमकरच्या हत्येनंतर पोलिसांनी व्यापक तपास करून टोळीच्या अनेक सदस्यांना गजाआड केले. तपासादरम्यान आरोपी मुनाफ पठाण, सोनाली वनराज आंदेकर यांचाही सहभाग उघडकीस आला, तसेच घरातील सीसीटीव्ही फुटेज डिलिट करणारा मोहन गाडेकर याला २६ सप्टेंबर रोजी अटक करून न्यायालयीन कोठडी देण्यात आली. कारवाईदरम्यान दोन पिस्तूल, चार चारचाकी, चार दुचाकी, २८ मोबाइल फोन, सोन्या-चांदी चे दागिने व रोकड असा एकूण ९५.२९ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच टोळी सदस्यांच्या ३७ बँक खात्यांतील १.४७ कोटी रुपये गोठविण्यात आले आहेत. टोळीच्या निष्पन्न मालमत्तेत बंडू आंदेकरची फुरसुंगी येथील २४.५ गुंठे जागा, कोथरूड व नाना पेठेतील फ्लॅट्स व दुकाने, वृंदावणी वाडेकरचे तीन मजली घर, शिवम व शिवराज आंदेकर यांची मालमत्ता, तसेच सोनाली आंदेकरच्या नावे असलेली दुकाने यांचा समावेश असून, पोलिसांनी त्याचा तपास हाती घेतला आहे. दरम्यान, आंदेकर टोळीविरुद्ध फरासखाना पोलीस ठाण्यात खंडणीप्रकरणी व समर्थ पोलीस ठाण्यात सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी आणखी गुन्हे दाखल झाले आहेत.

# स्वच्छ शहर जोडी उपक्रमात पिंपरी चिंचवड महापालिका ठरली मार्गदर्शक



## पाच नगरपरिषदांसोबत सामंजस्य करार

**पिंपरी । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या स्वच्छ शहर जोडी (डड्ग) उपक्रमात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निवड देशातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या मार्गदर्शक शहरांमध्ये झाली आहे. या यशस्वी निवडीमुळे पिंपरी चिंचवड महापालिका आता लहान शहरांसाठी आदर्श ठरणार आहे.

या उपक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या शहरांना, उत्तम कामगिरी करण्यासाठी काही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महापालिका पुढील पाच नगरपरिषद व नगरपंचायतींना मार्गदर्शन करणार आहे –

सुरगाणा नगरपंचायत (जि. नाशिक)

लांखादूर नगरपंचायत (जि. भंडारा)

मंचर नगरपंचायत (जि. पुणे) जामखेड नगरपरिषद (जि. अहिल्यानगर) आळंदी नगरपरिषद (जि. पुणे) या संदर्भातील सामंजस्य कराराचा कार्यक्रम ऑटो क्लस्टर, पिंपरी येथे पार पडला. केंद्रीय मंत्री मा. मोहनलाल खट्टर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या व्हिडिओ कॉन्फरन्स बैठकीत हा करार झाला. यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी करारावर स्वाक्षरी केली.

कार्यक्रमाला अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, आरोग्य विभाग प्रमुख व उप आयुक्त सचिन पवार यांच्यासह संबंधित नगरपरिषदांचे मुख्याधिकारी महादेव खांडेकर (आळंदी), अजय साळवे (जामखेड), गोविंद जाधव (मंचर), सचिन कुमार पटेल (सुरगाणा) आदी मान्यवर उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह यांनी या नगरपरिषदांच्या घनकचरा व्यवस्थापन, कचरा विलगीकरण, संकलन व प्रक्रिया प्रणालींचा सविस्तर आढावा घेतला. या संदर्भात ते म्हणाले पिंपरी चिंचवड महानगरपालिका या सर्व नगरपरिषदांना स्वच्छता क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी साध्य करण्यासाठी

# ओल्या दुष्काळात विद्यार्थ्यांवर आर्थिक भार! विद्यापीठाच्या परीक्षा शुल्कवाढीला विद्यार्थ्यांकडून जोरदार विरोध

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने परीक्षा शुल्कात २० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाला अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने करण्याचा निर्णय घेतला.

या निर्णयानुसार आधीच अधिक प्रमाणात आकारण्यात येणाऱ्या छायांकित प्रत आणि पुनर्मूल्यांकन शुल्कामध्ये आणखी भर पडणार आहे.



विरोध दर्शवला असून, ही शुल्कवाढ त्वरित रद्द करण्याची मागणी केली आहे. महाराष्ट्रातील काही भागांतील भीषण पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ही वाढ अन्यायकारक असून, पाच दिवसांत कार्यवाही न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा अभाविपने दिला आहे.विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने २४ सप्टेंबर रोजी परीक्षा शुल्कात वाढ राज्यातील अनेक जिल्हे ओल्या दुष्काळाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत सामान्य घरातील विद्यार्थ्यांसाठी ही शुल्कवाढ अवाजवी आणि अन्यायकारक आहे. हा निर्णय म्हणजे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अंधारात ढकलण्याचा प्रकार आहे, असे अभाविपचे पुणे महानगरमंत्री राधेय बाहेगव्हाणकर यांनी म्हटले आहे.

# आपत्तीग्रस्तांना सिंहगड रस्त्यावरील सेवेकरी मंडळाची मदत



**पुणे । प्रतिनिधी**

सिंहगड रस्ता येथील श्री स्वामी समर्थ सेवेकरी मंडळाच्या पुढाकारातून करंजी (ता. पाथर्डी) येथील आपत्तीग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

या वेळी मंडळाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, महाराष्ट्रातील बांधव संकटात सापडले असताना कर्तव्य म्हणून ही मदत करण्यात आली. या उपक्रमासाठी सिंहगड रस्त्यावरील नागरिकांचे मोलाचे सहकार्य लाभले. प्रत्यक्ष आपत्तीग्रस्त भागात जाऊन मदत वाटप केल्याने तेथील परिस्थितीची जाण झाली असून लवकरच मदतीची दुसरी फेरी नेण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या मदतीत एका महिन्यासाठी पुरेल एवढा धान्यसाठा, जीवनावश्यक वस्तू आणि वैद्यकीय साहित्याचा समावेश होता. या उपक्रमात समीर जागडे, मंगेश बुजवे, संजय वाघमारे, विक्रांत ढवळे, राज वाघमारे, सचिन पोतदार, अमोल राणे, सचिन शिंदे, बाळु गवळी, अक्षय घोडके, अजिंक्य घोडके, प्रथमेश बधे, ओंकार गवळी, सुरेश गालफाडे, दत्ता घोरपडे, संतोष तोंडे, अजय वाघमारे, कौस्तुभ ताम्हणकर, सौरभ मंडावले आदींनी विशेष मेहनत घेतली.

# भीमा नदीच्या पुरात बुडाली वॅगनआर गाडी; एकजण बुडाल्याची भीती



**पुणे । प्रतिनिधी**

टोकेवाडी (कडूस), ता. खेड येथील चासकडे जाणाऱ्या मोरी पुलावरून वॅगनआर गाडी भीमा नदीच्या पुराच्या पाण्यात बुडाली. त्यात एक जण बुडाल्याची भीती व्यक्त होत आहे. खेड तालुक्यात शनिवारी (दि. २७) रात्री पासुन रविवारी (दि. २८) दुपार पर्यंत जोरदार पाऊस झाला. चासकमान धरण परिसरात पावसाचा जोर वाढला होता. नद्या नाले भरून वाहत होते. तर भीमा नदीला पूर आला होता.

अशातच धरणातून रविवारी दुपारी ३० हजार क्युसेक वेगाने नदीपात्रात पाणी सोडण्यात येत होते. चास येथे भीमा नदी दुथडी भरुन वाहत होती. पुराच्या पाण्याचा मोठा प्रवाह सुरू असताना कडूसच्या टोकेवाडी बाजूकडून एक वॅगनआर आली आणि वेगात पाण्यात गेली. काही वेळ ती तरंगली मात्र पाण्यात बुडुन खड्यात अडकली. त्यात चालक असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. स्थानिक नागरिकांनी गाडी पाण्यात तरंगत असताना त्यातील दोघांना वाचवण्यासाठी पाण्यात उड्या मारल्या. मात्र पुराचा वेग वाढला असल्याने जवळ जाईपर्यंत गाडी बुडाली होती.

# भीमा नदीच्या पुरात बुडाली वॅगनआर गाडी; एकजण बुडाल्याची भीती

**इंदापूर । प्रतिनिधी**



इंदापूर तालुक्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना दिलासा देण्यासाठी उपजिल्हा रुग्णालयात मोफत डायलिसिस सेंटर सुरू करण्यात आले आहे. या सेवेचा प्रारंभ रविवारी (ता. २८ सप्टेंबर २०२५) राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते झाला. यावेळी रुग्णांशी संवाद साधताना त्यांनी तालुक्यातील गरजू रुग्णांना या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले. डायलिसिससाठी लागणारी सर्व औषधे आणि तपासण्या मोफत उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कृषिमंत्री भरणे म्हणाले, या सेवेमुळे रुग्णांना बाहेरील तालुक्यांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही आणि आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागणार नाही. त्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुग्णसेवेत कोणताही हलगर्जीपणा न करण्याच्या सूचना दिल्या. तसेच, कामचुकारपणाची गंभीर दखल घेत कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी वैद्यकीय अधिकारी सिद्धार्थ नामपल्ली, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष अतुल झगडे, प्राध्यापक अशोक मखरे, बाळासाहेब ढवळे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

कुत्रा चावल्यावर उपचार मोफत कृषिमंत्री भरणे यांनी यावेळी आणखी एक महत्त्वाची घोषणा केली. ते म्हणाले, कुत्रा चावल्यास घाबरण्याची गरज नाही. उपजिल्हा रुग्णालयात यापुढे कुत्रा चावल्यावर इंजेक्शन्स आणि उपचार मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतील. त्यांनी नागरिकांना या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

# अखेर पिंपरखेड येथील शेतरस्ता खुला; शिव पाणंद शेत रस्ते चळवळीच्या समन्वयाने मार्ग सुकर

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील मौजे पिंपरखेड येथील बोंबे वस्तीवर जाणारा शेतरस्ता दीड वर्षांपासून वादग्रस्त ठरला होता. मात्र महसूलमंत्री व शासनाने शेतरस्ते खुले करण्याच्या मोहिमेसह शिव पाणंद शेत रस्ते चळवळीच्या पुढाकारामुळे अखेर हा शेतरस्ता खुला झाला. विशेष म्हणजे, सुरुवातीला मोठा विरोध असतानाही बिगर पोलिस बंदोबस्तात तणाव कमी करून प्रशासनाने व चळवळीच्या कार्यकर्त्यांनी समन्वय साधला.

तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी २६ सप्टेंबर रोजी या रस्त्याबाबत आदेश दिला होता. अर्जदाराने कोर्टात कॅव्हेट दाखल केले असतानाही तहसीलदारांचा



आदेश अबाधित राहिला आणि महसूल यंत्रणेच्या कठोर भूमिकेमुळे व समन्वयकांच्या मध्यस्थीने रस्ता खुला करण्यास यश आले. यावेळी मंडलाधिकारी राजेंद्र पोटकुले, ग्राम महसूल अधिकारी सुग्रीव मुंढे, कोतवाल सारिका वरे, शिव पाणंद शेत रस्ते चळवळीचे प्रणेते शरद पवळे, ड. सुप्रिया साकोरे, , ड. सागर जोरी, ड. योगेश बारहाते, पत्रकार रवींद्र खुडे

तसेच पिंपरखेड व चांडोह येथील पोलीस पाटील यांच्यासह वादी व प्रतिवादी शेतकरी आणि परिसरातील शंभराहून अधिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरुवातीला शेतरस्ता खुला करण्यास विरोध झाला, मात्र शासन व महसूल यंत्रणेची ठाम भूमिका आणि चळवळीच्या समन्वयाने अनेक वर्षांपासून बंद असलेले दोन महत्त्वाचे रस्ते खुले झाले. त्यामुळे शेकडो एकर जमिनींच्या शेतीसाठी मोठा दिलासा मिळाला आहे. विशेष म्हणजे, प्रतिवादी शेतकऱ्याच्या दाणे भरलेल्या उभ्या मका पिकाचे जेसीबीमुळे होणारे नुकसान होऊ नये म्हणून, शरद पवळे व चळवळीच्या कार्यकर्त्यांनी स्वतः दोन सऱ्या उपटून देत शेतकऱ्याला मदत केली. या संवेदनशील भूमिकेचे सर्व उपस्थित शेतकऱ्यांनी कौतुक केले. रस्ता खुला झाल्यानंतर शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत शेतातच मासवडीचे जेवण देऊन सर्वांचा सत्कार केला. या सामूहिक आनंदसोहळ्याचे फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले असून, नेटकर्यांनी शेतकऱ्यांच्या आनंदाला भरभरून प्रतिसाद दिला आहे.

# कडूस परिसरात बिबट्याचा मुक्त संचार

**कडूस । प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यात दिसणाऱ्या बिबट्या आता खेड तालुक्यातील सर्वात मोठी लोकसंख्या आणि बाजारपेठ असणाऱ्या कडूस (ता. खेड) परिसरात मोठ्या संख्येने दिसू लागला आहे. खेड तालुक्यात बिबट्याने चांगलेच बस्तान बसवले आहे. घरासमोर मुक्त फिरणारा बिबट्या कॅमेऱ्यात कैद झाला आहे. बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.



कडूस परिसरात बिबट्यांची दिवसेंदिवस वाढणारी संख्या आणि नागरी भागातील मुक्त वावर यामुळे बिबट्याची दहशत वाढतच आहे.शनिवारी (दि. २७) संध्याकाळी महेंद्र धायबर यांच्या घराकडे चारचाकी वाहनात जात असताना अमोल (गोट्या) ढमाले, शुभम खळदकर, विशाल मोहन ढमाले, आर्यन धायबर, अतुल मोढवे, महेश ढमाले, पनय राजगुरू, भावेश तुपे, महेश नेहेरे, यांनी मोबाईल कॅमेरात बिबट्या कैद केला. तर रविवारी (दि. २८) भर दिवसा पाऊस सुरू असताना कडूस गावच्या पाझर तलावा जवळ नागरिकांना दिसला. परिसरात बागायती क्षेत्र असून बिबट्याचे दिवसा दर्शन होत असून कुत्रा, शेळी, कोंबडी, आदी पाळीव प्राण्यांवरील हल्ल्यांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. पाळीव प्राण्यांवरील हल्ल्यांमुळे शेतकरी हतबल झाले असून परिसरात लवकरात लवकर पिंजरा लावण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

पुर्वी शेतात शेवारात दिसणारे बिबटे आता रात्रीच्या वेळी कडूस गावठाणात असणाऱ्या नागरि वस्तीत येऊ लागले आहेत. बिबट्याचा संचार वाढला असून ग्रामस्थांची मात्र झोप उडालीअसल्याचे उद्योजक शुभम खळदकर यांनी सांगितले.

सद्या शिवारात कांदा लागवडी सुरू असून जंगलात संचार करणारे बिबटे सद्या नागरीवस्तीत येऊन जनावरे व माणसांना लक्ष्य करत आहे. यामुळे शेतात जाणे अवघड झाले आहे. स्थानिक ग्रामस्थ महेंद्र धायबर यांनी सांगितले.